# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३०८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## छत्तीसगडमध्ये मोठा हल्ला, नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलाचे वाहन उडवले, नऊ जवान शहीद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६बिजापूर**

छत्तीसगडमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. नक्षलवाद्यांनी पोलिसांच्या वाहनावर हल्ला केला असून या हल्ल्यात नऊ जवान शहीद झाल्याची माहिती समोर आली आहे. सोमवारी दुपारी अबुझमदच्या दक्षिण भागात नक्षलवाद्यांशी झालेल्या चकमकीनंतर परतणाऱ्या जवानांचे पिकअप वाहन नक्षलवाद्यांनी स्फोटकांनी उडवले. सुरक्षा दलाचे एक पथक घटनास्थळी पाठवण्यात आले आहे.

या हल्ल्यात आठ जिल्हा राखीव रक्षक जवान आणि एक चालक शहीद झाल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना बिजापूर जिल्ह्यातील कुत्रु भागात घडल्याचे सांगितले जात आहे. रविवारी चकमक झाल्यानंतर हे जवान नारायणपूरहून परतत होते.

बिजापूर जिल्ह्यातील कुत्रु–बेद्रे मार्गावरील आमेलीजवळ हा हल्ला झाला. रविवारी नारायणपूरमध्ये झालेल्या चकमकीनंतर जवान



परतत होते. चार दिवस जंगलात फिरून सैनिक थकले होते. त्यामुळे ते पिकअप वाहनातून परतत होते.


या घटनेबाबत आयजी बस्तर म्हणाले की, विजापूरमध्ये नक्षलवाद्यांनी आयईडी स्फोटाद्वारे वाहन उडवून दिल्याने ड्रायव्हरसह दंतेवाडाचे ९ डीआरजी जवान शहीद झाले. दंतेवाडा, नारायणपूर आणि विजापूर येथील संयुक्त कारवाईवरून ते परतत होते. घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून संपूर्ण परिसरात नक्षलवाद्यांचा शोध सुरु आहे

## भारतात HMPV चा तिसरा रुग्ण अहमदाबादमध्ये दोन महिन्यांच्या मुलाला संसर्ग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ अहमदाबाद १९**

चीनमध्ये मोठ्या संख्येने मुलांना या व्हायरसची लागण होत आहे. रुग्णालयांमध्ये लांबच लांब रांगा लागल्याचे दावे केले जात आहेत. दरम्यान, भारतातही या नवीन व्हायरसची प्रकरणे दिसू लागली आहेत. गुजरातमधील अहमदाबाद येथील एका दोन महिन्यांच्या मुलाचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. सध्या या मुलावर अहमदाबाद येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

आतापर्यंत भारतात तीन रुग्ण आढळले आहेत. गुजरातव्यतीरिक्तकर्नाटक या एकाच राज्यात दोन रुग्ण आढळले आहेत. कर्नाटकात एक तीन महिन्यांची मुलगी आणि दुसरा ८ महिन्यांच्या मुलाचा यात समावेश आहे. या व्हायरसमुळे घाबरून जाण्याची गरज नाही, असे कर्नाटक सरकारने म्हटले आहे. या दोन्ही प्रकरणांमध्ये आंतरराष्ट्रीय प्रवासाचा कोणताही इतिहास नाही.



गुजरात सरकारच्या आरोग्य विभागाने HMPV व्हायरसबाबत विशेष मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. सातत्याने वाढत असलेल्या प्रकरणांमुळे सर्वांचीच चिंता वाढली आहे. यामुळे आता आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. देशभरात आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे.

दरम्यान, HMPV सहसा फक्त लहान मुलांमध्ये आढळतो. सर्व फ्लू नमुन्यांपैकी ०.७ टक्के HMPV चे असतात. तसेच, या व्हायरसचा स्ट्रेन काय आहे? हे अद्याप समजलेले नाही. अशा परिस्थितीत आरोग्य तज्ज्ञांनी या व्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी दक्षता आणि सार्वजनिक आरोग्य मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, लोकांना हात धुणे आणि मास्क वापरण्याचा आणि इतर खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**HMPV म्हणजे काय?**

ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस हा RNA व्हायरस आहे, जो Pneumoviridae कुटुंबातील आहे. २००१ मध्ये डच संशोधकांनी याचा प्रथम शोध लावला होता. हा व्हायरस प्रामुख्याने श्वसन संक्रमणास कारणीभूत ठरतो आणि खोकल्यामुळे किंवा शिंकण्याद्वारे पसरतो. संक्रमित लोकांच्या संपर्कात आल्याने देखील ते वेगाने पसरू शकते. त्याच्या संसर्गाचा कालावधी ३ ते ५ दिवसांचा असतो आणि हिवाळ्यामध्ये हे सर्वात सामान्य आहे.

## तुम्ही माझे मालक नाही झालात; अजित पवारांच्या विधानावर भुजबळ म्हणतात, एवढं बोलायला...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई १८**

उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे नेहमी ओळखले जातात. रविवारी बारामती दौऱ्यावर असताना अजित पवार हे त्यांच्या कार्यकर्त्यांवर चांगलेच संतापल्याचे पाहायला मिळाले. तुम्ही मला मतं दिली म्हणजे माझे मालक नाही झालात अशा शब्दात अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना सुनावलं. मात्र अजित पवार यांच्या या विधानावरुन विविध प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. अशातच राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनीही अजित पवारांच्या या विधानाबाबत भाष्य केलं आहे. मतदार हे देशाचे मालक आहेत असं छगन भुजबळ यांनी म्हटलं.

परदेश दौऱ्यावरुन परतल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीमधील मेडद येथील एका नवीन पेट्रोल पंपाचं उद्घाटन केले. यावेळी कामाच्या संदर्भातील निवेदन दिले जात होते. त्यावेळी एका कार्यकर्त्याने अनेक कामे झाली नसल्याचं म्हटलं. त्यापाठोपाठ नागरिकांनीही असंच म्हटलं. त्यामुळे संतापलेल्या अजित पवारांनी, "अरे तुम्ही मला मतं दिली म्हणजे माझे मालक नाही झालात. मला सालगडी केलंय का?" असं विधान केलं. अजित पवाराच्या या विधानावरुन



बोलताना त्यांनी एवढं बोलायला नको होतं असं छगन भुजबळ म्हणाले.

"त्यांनी एवढं बोलायला नको होतं एवढेच मी म्हणेन. लोक आपल्या मंत्र्यांचे मालक आहेत की नाही ही गोष्टच नाही. मतदाता हे राज्याचे आणि देशाचे मालक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सगळ्यांना देशाचे मालक बनवले आहे," असं छगन भुजबळ यांनी म्हटलं.

बुलढाण्याचे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनीही केलेल्या विधानावर छगन भुजबळ यांनी भाष्य केलं. "संजय गायकवाड यांना माजी मुख्यमंत्र्यांनी लगाम लावायला हवा. माझ्या बाबतीतही त्यांनी अशीच काही वक्तव्ये केली होती. एकनाथ शिंदे यांनी त्यांना समजवायला हवं," असं भुजबळ म्हणाले.

दरम्यान, मंत्रिपद न मिळाल्याने छगन भुजबळ यांनी जाहीर नाराजी बोलून दाखवली होती. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सुनील तटकरे यांच्यावरही खोचक टीका केली होती. येवल्यात कार्यकर्त्यांशी बोलताना वाह रे, दादाचा वादा, कसला वादा अन्? कसला दादा, असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर निशाणा साधला होता.

## उद्यापासून राज्यभरातील प्राणी संग्रहालये बंद राहण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६नागपूर**

एकीकडे एचएमपीव्ही व्हायरसने भारतात शिरकाव केल्याने खळबळ उडालेली असताना प्राणी संगहालयांमध्ये देखील एव्हियन फ्लच्यू विषाणूने उत्पात माजविला आहे. नागपूरमध्ये तीन वाघांच्या मृत्यूनंतर केंद्र सरकारने प्राणी संग्रहालये बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. उद्यापासून प्राणी संग्रहालये बंद राहण्याची शक्यता आहे. प्राण्यांना एव्हियन फ्लच्यू विषाणूची लागण होत असल्याने केंद्र शासनाचे निर्देश आले आहेत. नागपुरतील गोरेवाडा येथील तीन वाघांच्या मृत्यूनंतर आता केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राणी संग्रहालय बंद करण्यास सांगण्यात आले आहे.

यामुळे उद्यापासून राज्यातील प्राणी संग्रहालय काही काळासाठी बंद ठेवण्यात येण्याची शक्यता आहे. आज सायंकाळपर्यंत याविषयी निर्देश येण्याची शक्यता आहे. आज सोमवार असल्याने नागपूरचे महाराजबाग बंद आहे. महाराजबाग येथे कोणत्याही प्राण्याला कुठलीही संसर्गाची लक्षणे आढळून आलेली नाहीत, असे डॉ. सुनील बावस्कर, महाराज बाग प्राणी संग्रहालय प्रभारी अधिकारी, नागपूर यांनी सांगितले आहे.

## शेतकरी, मेंढपाळांच्या हक्कासाठी उद्याला बच्चू कडूंच्या नेतृत्वात वाडा आंदोलन

### शेतकरी नेते महादेव जानकर आंदोलनात होणार सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, मेंढपाळ आदींचे कैवारी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी राज्य शासनाच्या धोरणाविरोधात एल्गार पुकारला आहे.मंगळवारी शेतकरी व मेंढपाळांच्या हक्कासाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वात अमरावतीत वाडा आंदोलन होणार असून या आंदोलनात शेतकरी नेते महादेव जानकर हे सुद्धा उपस्थित राहणार आहेत. काही दिवसांपूर्वी बच्चू कडू यांनी राज्य शासनाला शेतकरी व मेंढपाळ यांच्या काही मागण्यांसंदर्भात अल्टीमेटम दिला होता मात्र नेहमीप्रमाणे शासनाने दोघांच्याही मागण्यांकडे पाठ फिरवल्याने अखेर आज शेतकरी व मेंढपाळ यांना सोबत घेऊन बच्चू कडू हे अमरावतीत वाडा आंदोलन करणार आहेत. एकीकडे नविन वर्षात रासायनिक खतांमध्ये वाढ करण्याची भूमिका सरकार घेत आहे, तर दुसरीकडे शेतमालाला जवळजवळ ५० टक्क्यांनी कमी भाव मिळत आहे. राज्यातील मेंढपाळ आपल्या न्याय मागणीकरिता सरकारचे उंबरठे झिजवित असताना त्यांच्या मागण्यांच्या संबधात मुख्यमंत्री कुठलेही ठोस पाऊल उचलत नाहीत. शेतकरी व मेंढपाळ वाचला पाहीजे याकरिता पुन्हा एकदा बच्चू कडू यांनी हुंकार भरत राज्य सरकार विरुद्ध दंड थोपटले आहे. शेतकरी व मेंढपाळांसाठी आंदोलन छेडून त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी बच्चू कडू यांनी वाडा





आंदोलनाच्या माध्यमातून सरकारला जागे करण्याचा प्रयत्न करणार आहे. सोयाबीन, तूर, कापसाला दिवसेंदिवस भाव वाढ मिळायला पाहीजे. मात्र या उलट या पिकांचे भाव कमी होत जाताना पहायला मिळत आहे. सोयाबीन ७ हजाराहून ३५०० रुपयांवर आले, तूर १३ हजार रुपये क्विंटलहून ७ हजार रुपये क्विंटलवर आली. कापसाला काही दिवसांपुर्वी १० हजार रुपये प्रती क्विंटल भाव मिळायचा, आज कापसाला ७००० रुपये प्रती क्विंटल भाव मिळत आहे. दुसरीकडे बियाणे, रासायनिक खते, शेणखताचे भाव वाढत जात आहे. अशी परिस्थिती असताना शेतक:यांनी १२ महिने आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा? असा सवालही कडू यांनी यावेळी सरकारला विचारला. या परिस्थितीमूळे शेतक:यांचे जगणे कठीण झाले आहे, आणि त्यामूळेच शेतकरी आत्मघातकी निर्णय घेवू लागला आहे. हा शेतकरी वाचवायचा असेल तर त्याचे संरक्षण होणे महत्वाचे आहे. त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहीजे, वण्यप्राण्यांपासून त्याच्या पिकाचे संरक्षण झाले पाहीजे, त्याला पीक नुकसानीचे पिक विम्याव्दारे भरपाई मिळणे गरजेचे आहे, राज्य सरकारने विधानसभा निवडणूकीच्या काळात घोषीत केलेली सरसकट कर्जमाफी शेतक:यांना तातडीने मिळावी, चराईकरिता परराज्यातून येणा:या मेंढपाळांवर बंदी घालण्यात यावी अश्या अनेक मागण्या यावेळी वाडा आंदोलनातून करण्यात येणार आहे. वाडा आंदोलनाची प्रशासनाने धास्ती घेतली असून यासंदर्भात नोटीस सुद्धा देण्यात आली आहे मात्र आपण कोणत्याही नोटीस ला घाबरत नसून आणि कुणाच्याही दबावाला बळी पडणार नसून हे वाडा आंदोलन करणार आणि शेतकरी, मेंढपाळ वर्गाला न्याय मिळवून देणार अशी भूमिका बच्चू कडू यांनी घेतलेली आहे.अमरावती जिल्ह्यातील शेतकरी बांधव व मेंढपाळ बांधव या वाडा आंदोलनात सहभागी होत असल्याची माहिती असून पोलीस प्रशासन मात्र आंदोलन दडपण्याचा तयारीत आहे.




संपादकीय ......

# बाहुबली अन् आका

गेल्या वर्षी २०२४ मध्ये भगवानबाबा गडावर झालेल्या दसरा मेळाव्यात पंकजा मुंडे या मंचावर बसलेल्या नेत्यांची समोर जमलेल्या हजारोंच्या सभेला मोठ्या उत्साहाने ओळख करून देत होत्या. तेव्हा गर्दीतून वाल्मीक अण्णांच्या नावाने ओरडा झाला. तेव्हा पंकजा म्हणाल्या, वाल्मीकशिवाय धनंजय यांचे पानही हालत नाही पंकजा यांच्या वक्तव्यावर गर्दीने मोठा प्रतिसाद दिला व पंकजा म्हणतात ते खरे आहे, यावर शिक्कामोर्तब झाले. पण या प्रकाराने मंचावर बसलेले धनंजय मुंडे मात्र काहीसे अस्वस्थ झालेले दिसले. बीडमधील मस्साजोगचे तरुण सरपंच संतोष देशमुख यांचे झालेले अपहरण आणि त्यांच्या झालेल्या निर्घृण हत्याप्रकरणी वाल्मीक कराड यांची नेमकी काय भूमिका आहे हे अजूनही तपासात पुढे आलेले नाही पण भाजपाच्या आमदारांसह इतर बड्या नेत्यांनी केलेल्या आरोपांमुळे संशयाची सुई त्यांच्या दिशेने फिरत आहे. सरपंच संतोष देशमुखची हत्या झाल्यापासून वाल्मीकवर गेले तीन आठवडे आरोपांच्या फैरी झडत आहेत. बीड जिल्ह्यात 'वाल्मीक बोले व पोलीस-प्रशासन डोले' असे म्हटले जात आहे. धनंजय मुंडे यांचा राजकीय वरदहस्त असल्यामुळेच वाल्मीक हा शक्तिशाली बाहुबली बनलाय असे आरोप उघडपणे होत आहेत. सरपंच संतोष देशमुख याच्या खुनाशी आमचा काही संबंध नाही, जो दोषी असेल त्याला फाशीची शिक्षा द्यावी, असे धनंजय मुंडे व वाल्मीक कराड यांनी म्हटले आहे. जर संबंध नाहीत तर वाल्मीक २२ दिवस पोलिसांच्या हाती का लागत नव्हता. नागपूर, उज्जैन, गोवा, अक्कलकोट, पुणे असा फिरत का होता? विशेष म्हणजे सरपंचाच्या हत्येनंतर वारंवार वाल्मीकचा उल्लेख होत असताना व त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला असताना तो पोलिसांना गुंगारा का देत राहिला?

गोपीनाथ मुंडे यांच्या मृत्यूनंतर त्यांचा पुतण्या धनंजय मुंडे यांचे बीड जिल्ह्यात प्रस्थ वाढले. गोपीनाथ मुंडे यांची कन्या पंकजा व प्रीतम या दोन्ही बहिणी त्यांच्या खऱ्या राजकीय वारस. गोपीनाथ मुंडेंनी पंकजालाच राजकारणात पुढे केले. पण धनंजय मुंडेंच्या राजकीय ताकदीपुढे पंकजा यांना आपल्या अस्तित्वासाठी सतत संघर्ष करावा लागला. गोपीनाथ मुंडेंच्या मृत्यूनंतर धनंजय मुंडेंनी जिल्ह्यात आपले साम्राज्य उभे केले. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्यावर शरद पवारांनी त्यांना भरपूर संधी दिली. मिळालेल्या सत्तेतून आपली फौज, आपले नेटवर्क निर्माण केले. त्यातूनच धनंजय मुंडे यांचा राजकीय वरदहस्त लाभलेल्या वाल्मीक कराड हा शक्तिशाली बनला. धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड म्हणजे बीड जिल्ह्याचे नंबर १ व नंबर २ अशी ओळख निर्माण झाली. छोटा आका आता सीआयडीच्या ताब्यात आहे. धनंजय मुंडेंनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी केली जात आहे. मी कशासाठी राजीनामा देऊ, माझा काहीच संबंध नाही, असे धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले आहे.

पोलिसांच्या व सीआयडीच्या रडारवर असताना बावीस दिवसांनी वाल्मीक कराड आलिशान स्कॉर्पिओमधून पुण्याच्या पाषाण येथील सीआयडी ऑफिसमध्ये शरण आला व त्या अगोदर त्याने एक व्हीडिओ वायरल करून त्याची भूमिका जनतेपुढे मांडली. व्हीडिओत तो म्हणतो, मला अटकपूर्व जामीन घेण्याचा अधिकार असताना, मी पुणे सीआयडी ऑफिसमध्ये शरण येतो आहे. सरपंचाच्या हत्येमध्ये आपले नाव राजकीय द्वेषापोटी गुंतवले आहे पोलिसांना शरण येतानाही त्याची मस्ती कायम होती की, त्याच्या रणनितीचा भाग होता? सीआयडी ऑफिसमध्ये शरण येणे हा त्याचा स्टंट होता की, कोणाच्या सल्ल्यानुसार तो तसा वागला? वाल्मीकचे नाव तीन आठवडे मीडियातून रोज ठळकपणे प्रकाशात असताना तो व्हीडिओ व्हायरल करून शरण येतो ही पोलिसांना नामुष्की नाही का? वाल्मीक आलिशान वातानुकूलित मोटारीतून पोलिसांना शरण आला हे पोलिसांचे अपयश म्हटले पाहिजे. पोलिसांना शरण यायचे ते कुठे व कोणत्या वेळेला याचा निर्णयही त्याने घेतला. त्याला व अन्य फरारी आरोपींना अटक व्हावी यासाठी २८ डिसेंबरला बीडमध्ये सर्वपक्षीय विराट मोर्चा निघाला. दोन हजार ग्रामपंचायतींचे कामकाज तीन दिवस बंद राहिले. नागपूरला विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या काळात सरपंचांच्या निर्घृण हत्येवरून आमदार सुरेश धस, संदीप क्षीरसागर यांनी बीड जिल्ह्यातील दहशतवादाचे सारे वास्तव प्रखर शब्दांत मांडले. तीन वेळा जनतेतून निवडून आलेल्या सरपंचाला हल्लेखोर उचलून नेतात, मोटारीतून अपहरण करतात नि त्याला लाठ्या-काठ्या, कोयता आणि धारदार शस्त्रांचे वार करून त्याच्या शरीराची चाळण करतात, हे सर्व चित्रपटातील कथानकालाही लाजवणारे आहे.

सरपंचांची क्रूर हत्या करणाऱ्या टोळीचा म्होरक्या कोण आहे? दहशत, खंडणी, हत्या करणाऱ्या टोळीमागे कुणाचे पाठबळ आहे? बीड जिल्ह्यातील पोलीस प्रशासन अशा बाहुबलीपुढे हतबल आहे काय? वर्षानुवर्षे दहशत आहे. मग सरपंचांची हत्या झाल्यावर लोकक्षोभ कसा प्रकटला? कोणाचेही सरकार असो, गृह खाते बीड जिल्ह्यातील दहशतवादाविषयी अनभिज्ञ होते की तिथल्या आका नि बाहुबलीच्या गुंडगिरी व हुल्लडबाजीकडे दुर्लक्ष केले जात होते? केवळ खंडणीचा गुन्हा पुरेसा नाही, तर खुनाचा गुन्हा दाखल करा, कट-कारस्थान आहे का याची चौकशी करा, वाल्मीक दोषी नव्हता, तर फरार का झाला हे शोधा अशा मागण्या विधिमंडळात व जाहीरपणे झाल्या. संतोष देशमुखच्या खुन्यांना अटक करताना त्यांच्या मास्टर माईंडलाही जेलमध्ये टाका अशी सातत्याने मागणी आमदार-खासदारांकडून झाली. संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना कोण वाचवत आहे हे सुद्धा समजले पाहिजे. सरपंचाची हत्या ९ डिसेंबरला झाली, आरोपी सापडत नाहीत म्हणून जनतेत प्रक्षोभ वाढला.

२७ डिसेंबरला रेणापूरला आक्रोश मोर्चा निघाला, २८ डिसेंबरला बीडमध्ये लाखोंच्या संख्येने सर्वपक्षीय मूक मोर्चा निघाला. दोषींना कठोर शिक्षा द्यावी यासाठी खासदार बजरंग सोनवणे, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर, छ. संभाजी राजे, मराठा आंदोलकांचे नेते मनोज जरांगे-पाटील, जितेंद्र आव्हाड, नरेंद्र पाटील, नमिता मुंदडा आदींनी सरकारकडे तगादा लावला आहे.

परळीच्या औष्णिक ऊर्जा प्रकल्पातून निघणाऱ्या राखेची अवैध वाहतूक हा मुद्दा यानिमित्ताने ऐरणीवर आला आहे. काही शेकडो कोटींचा हा व्यवहार आहे. खरं तर पंधरा-सोळा कंपन्यांना राखेची वाहतूक करण्याची परवानगी आहे, पण राख माफियांच्या रांगेत ते कोणी घुसू शकत नाहीत, एवढी मोठी दहशत आहे. वाल्मीक हा मूळचा परळी तालुक्यातील पांगरी गावचा. दहावीनंतर तो परळीत आला. जत्रेत सिनेमा दाखवायचा. गोपीनाथ मुंडे यांच्याकडे घरकाम करायचा. त्यांच्या मुलींना शाळेत सोडायचा. काका-पुतण्या वेगळे झाल्यावर त्याने धनंजय मुंडेंशी जवळीक केली. परळी नगर परिषदेचा सदस्य, उपनगराध्यक्ष, गटनेता झाला. पुढे धनंजय मुंडेंचा विश्वासू माणूस बनला. धनंजय मुंडेंच्या राजकीय व्यवस्थापनाची जबाबदारी तोच संभाळत असे. विधिमंडळात संतोष

# नाराजीचा सूर...!


सामान्य लोकांच्या आयुष्यात नाराज होण्याची वेळ दिवसातून किमान १० ते १५ वेळा तरी येते. मनासारखे घडले नाही की, माणूस नाराज होतो हे अगदी नैसर्गिक आणि साहजिक आहे. आपण नाराज होतो, वैतागतो, चिडचिड होते; पण आपल्याकडे त्याचा काहीच उपाय नसतो म्हणून आपण इतर कामांकडे वळतो. एखाद्या गोष्टीची नाराजी किती काळ असावी, याचे काही नियम घालून दिले पाहिजेत, असे वाटते.

राजकीय लोकांनी विशिष्ट गोष्टींवर किती काळ नाराज असावे, याची सगळी हद्द संपलेली आहे. अटीतटीच्या निवडणुकीत एकदाचे निवडून आले की, आमदार मंडळी खूश होती. निवडून आलेल्या सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना मंत्रिपद मिळाले की, ते खुशीत होते. खाते जाहीर होऊनही बर्याच मंत्र्यांनी अद्याप पदभार स्वीकारलेला नाही, याचे मात्र आश्चर्य वाटते. आधी मंत्रिपद मिळाले नाही म्हणून नाराजी. मंत्रिपद मिळाले, तर पाहिजे ते खाते मिळाले नाही म्हणून नाराजी. पाहिजे ते खाते मिळाले नाही म्हणून नाराजी आहे. या सर्व बाबींची एकमेकांमध्ये गुंतागुंत आहे. एखादी गोष्ट न मिळाल्यास किती काळ नाराज राहायचे, याचे काही निश्चित नियम शासनाने आखून दिले पाहिजेत. म्हणजे मग, शासन कारभार सुरळीत चालायला सुरुवात होईल. खातेवाटप जाहीर झाले की, जास्तीत जास्त १५ दिवसांत पदभार न स्वीकारल्यास सदर मंत्र्याची ऑटोमॅटिक गच्छंती मंत्रिमंडळातून होईल, असा नियम केला, तर मंत्री तत्काळ पदभार घेतील आणि कामाला लागतील. कोणाच्याही नाराजीपेक्षा राज्याच्या प्रशासनाचा गाडा वेगाने धावणे ही काळाची गरज झाली आहे. साध्या शब्दात सांगायचे, तर लोकांनी याच कामासाठी या लोकांना भरघोस असे मतदान करून प्रचंड असे बहुमत प्रदान केलेले आहे. मंत्रिपद न मिळालेले काही आमदार जनतेची सेवा करायच्या कामाला लागण्याऐवजी थेट परदेशात फिरायला गेले आहेत, याची मात्र सुसंगती लागत नाही. बहुतेक नाराजीवर शांत राहून उपाय काढण्यासाठी परदेशातील भूमी जास्त अनुकूल असावी, असे वाटते. 'झाली नाराजी की निघ परदेशाला' अशी पद्धत रूढ झाल्यामुळे आपला देश विकसित झाला आहे, असे म्हणायला हरकत नाही. ज्या देशातील नागरिक स्वतःचीच नाराजी दूर करण्यासाठी परदेशी फिरायला जातात तो देश गरीब आहे, असे कसे म्हणता येईल?राजकारणामध्ये असे कधीच नसते. मंत्रिपद मिळाल्यानंतर आपल्या मतदारसंघात स्वीकारलेल्या फुलांचे हार सुकून गेले; पण मंत्री महोदयांनी अद्याप पदभार स्वीकारलेला नाही, हे गौडबंगाल काही समजत नाही. यादरम्यान 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' असे म्हणणारे मुख्यमंत्री मात्र झपाट्याने कामाला लागले आहेत, हे निश्चित! स्वातंत्र्यानंतर ज्या काही गावांना रस्ताच नव्हता तिथे गडचिरोली जिल्ह्यात रस्ता करून बसमधून सामान्य लोकांबरोबर प्रवास करून मुख्यमंत्री महोदयांनी दाखवून दिले आहे की, सोबत कोणी असो किंवा नसो; परंतु ते मात्र आता थांबणार नाहीत. गडचिरोलीसारख्या दुर्गम आणि दुर्लक्षित अशा जिल्ह्यामध्ये मुख्यमंत्र्यांनी बस प्रवास केला आणि सामान्यांशी संवाद साधला, याचे लोभस असे छायाचित्र महाराष्ट्राने पाहिले आहे.




## प्रोटीन-कॅल्शियमचा डबल डोस मिळेल, १०० ग्राम मनुके ४ पदार्थांसोबत खा; फिट राहाल, रक्तही वाढेल

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक** -जर मनुके योग्य पद्धतीनं खाल्ले तर तुमच्या शरीरातील कमकुवतपणा दूर होण्यास मदत होईल. अनेक आजारांना दूर ठेवण्यासाठी मनुके एक उत्तम औषध आहे. ज्या लोकांच्या शरीरात आयर्न, कॅल्शियमची कमतरता असते त्यांनी याचे रोज सेवन करायला हवे. पण एक दिवसाला किती खावेत असा प्रश्न अनेकांना पडतो. एक निरोगी व्यक्ती रोज १०० ग्राम मनुके खाऊ शकते. एससीबीआयवर प्रसिद्ध झालेल्या एका रिपोर्टनुसार रोज ८० ते ९० ग्राम मनुके खाल्ल्यानं संपूर्ण शरीराला फायदे मिळतात. अनेकांना काळजी वाटते की यामुळे ब्लड शुगर वाढू नये.



**मनुके कसे खावेत**- मनुके ४ पदार्थांसोबत भिजवून खायला हवेत. या पद्धतीनं खाल्ल्यास रक्तातील ग्लुकोज स्पाईक कंट्रोल करता येतो. मनुके खाण्याच्या सोप्या पद्धती समजून घेऊ.

**भाजलेले चणे आणि मनुके**- मनुके नॅच्युरल शुगर, आयर्न, कॅल्शियम, बोरोन, फायबर्स देतात. दुसरीकडे भाजलेले चणे, फायबर्स, प्रोटीन्सचा उत्तम स्त्रोत आहेत. दोन्ही वस्तूंचे मिश्रण ब्लड शुगर लेव्हल अचानक वाढवण्यापासून रोखतात. शरीर कमकुवत होत नाही आणि स्टॅमिना वाढतो.

**मनुके आणि बदाम**- मनुके आणि बदाम तुम्ही एकत्र भिजवून खाऊ शकता. बदामात हेल्दी फॅट्स असतात ज्यामुळे मेंदू आणि हृदयाचे आरोग्य चांगले राहते. रक्त वाढवण्याबरोबरच ब्लड सर्क्युलेशन चांगले राहते. तुम्ही रिकाम्या पोटी याचे सेवन करू शकता.

**शेंगदाणे आणि मनुके खाण्याचे फायदे**-थंडीच्या दिवसांत शेंगदाणे आणि मनुके खायला हवेत. यामध्ये प्रोटीन्स भरपूर प्रमाणात असतात ज्यामुळे मसल्स कमकुवत होत नाहीत. याशिवाय बायोटीन्स कॉपर, नियासिन, फॉलेट, व्हिटामीन ई, फॉस्फरस, मॅग्नेशियम मिळते. ज्यामुळे रक्ताची कमतरता दूर होण्यास मदत होते.

**मोड आलेली कडधान्य**

मोड आलेल्या कडधान्यांना स्प्राऊट्स असं म्हणतात. सकाळच्या वेळी याचे सेवन केल्यास बराचवेळ पोट भरलेलं राहतं. पचनक्रिया चांगली राहते. पोषक तत्वांचे अवशोषण होण्यास मदत होते. याशिवाय मनुके खाल्ल्यानं शरीराला आयर्न मोठ्या प्रमाणात मिळते.

रक्त वाढवण्यासाठी मनुके खाणं उत्तम ठरतं. रक्ताच्या कमतरतेमुळे थकवा, कमकुवतपणा, श्वास घ्यायला त्रास होणं, स्टॅमिना कमी होणं अशा समस्या उद्भवतात अशावेळी शरीर पिवळं पडू लागतं. वेगवेगळ्या पद्धतीनं मनुके खाऊन तुम्ही या समस्यांना दूर ठेवू शकता.

# ढगाळ हवामानात कशी घेणार पिकांची काळजी?

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

डिसेंबर महिन्यापासून हवामान सतत बदलताना दिसत आहे. रब्बी पिकांचीबदलत्या हवामानात कशी काळजी घ्यावी, या विषयीचा कृषी सल्ला वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी दिला आहे.

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार मराठवाड्यात पुढील ५ दिवस हवामान कोरडे तर पुढील ३ दिवस आकाश स्वच्छ राहून त्यानंतर २ दिवस अंशत: ढगाळ(उर्श्रीवू) राहण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यातील उत्तर भागात ६ आणि ७ जानेवारी रोजी धुके राहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात २ दिवसानंतर कमाल तापमानात हळूहळू २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता आहे तर किमान तापमानात हळूहळू २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे.

**हवामान सारांश / चेतावनी :**

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार मराठवाड्यात पुढील ५ दिवस हवामान कोरडे तर पुढील ३ दिवस आकाश स्वच्छ राहून त्यानंतर २ दिवस अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

**सामान्य सल्ला** :विस्तारीत अंदाजानुसार (ईआरएफएस) मराठवाड्यात ९ जानेवारीपर्यंत पावसाची शक्यता नाही, कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीपेक्षा कमी व १० ते १६ जानेवारी २०२५ दरम्यान पावसाची शक्यता नाही, कमाल तापमान सरासरीएवढे व किमान तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

**संदेश** : पिकास, फळबागेस, भाजीपाला व फुल पिकास आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ज्ञ समितीने पुढील प्रमाणे कृषि हवामान आधारीत कृषि सल्ल्याची शिफारश केली आहे.

**पीक व्यवस्थापन**

**ऊस** :पूर्व हंगामी ऊसाची लागवड करून ६ ते ८ आठवडे झाले असल्यास २६० किलो युरिया प्रति हेक्टरी देऊन पाणी द्यावे. नविन लागवड केलेल्या ऊस पिकात खुरपणी करून तण नियंत्रण करावे. ऊस पिकावर खोड किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० % २५ मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल १८.५% ४ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ऊस पिकावर पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, याच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३० % ३६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**हळद** :हळद पिकात आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. हळद पिकात कंदमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% २० मिली किंवा डायमिथोएट ३०% १५ मिली यापैकी एका किटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून-पालटून फवारणी करावी.

## विद्यापीठाने दिला सल्ला

(हळद पिकावर केंद्रीय किटकनाशक मंडळातर्फे लेबल क्लेम नसल्यामुळे विद्यापीठ शिफारशीत संशोधनाचे निष्कर्ष दिले आहेत).

उघड्या पडलेल्या कंदाजवळ कंदमाशीची मादी अंडी घालते त्यामुळे, उघडे पडलेले कंद मातीने झाकून घ्यावेत व वेळेवर हळदीची भरणी करावी. प्रति बंधात्मक उपाय म्हणून एक महिन्याच्या अंतराने प्रत्येक महिन्यात जमिनीतून क्लोरोपायरीफॉस ५०% ५० मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे आळवणी करावी. हळदीच्या पानावरील ठिपके / करपा रोग यांच्या व्यवस्थापनासाठी अझोक्सिस्ट्रॉबिन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४% (पुर्वमिश्रित बुरशीनाशक) १० मिली + ५ मिली स्टीकरसह प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. करपाजन्य रोगग्रस्त पाने वेळोवेळी जमा करून नष्ट करावीत.

**हरभरा** :हरभरा पिकास आवश्यकतेनुसार तुषार सिंचन पध्दतीने पाणी द्यावे. हरभरा पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकात घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थानासाठी शेतामध्ये इंग्रजी ढ आकाराचे प्रति एकर २० पक्षी थांबे लावावेत व घाटेअळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति एकरी २ कामगंध सापळे लावावेत.



**हरभरा पिकात घाटे अळीच्या** व्यवस्थानासाठी ५% (एनएसकेई) निंबोळी अर्क किंवा क्विनॉलफॉस २५% इसी २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३०% १३ मिली किंवा असिफेट ७५% १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**फळबागेचे व्यवस्थापन**

मृग बहार धरलेल्या संत्रा/मोसंबी बागेत फळ वाढीसाठी ००:५२:३४ १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अंबे बहार धरलेल्या संत्रा/मोसंबी बागेत वाळलेल्या व रोगग्रस्त फांद्याची छाटणी करावी व छाटणी केलेल्या फांद्यावर बोर्डो पेस्ट लावावी. संत्रा/मोसंबी बागेत अंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे. संत्रा/मोसंबी बागेत आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे.

काढणीस असलेल्या डाळींब फळांची काढणी करून घ्यावी.

चिकू बागेत अंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनुसार पाणी द्यावे.

**भाजीपाला**वांगे भाजीपाला पिकात शेंडा आणि फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास प्रादुर्भाव ग्रस्त शेंडे व फळे गोळा करून नष्ट करावेत व त्याच्या व्यवस्थापनासाठी शेतात एकरी २ कामगंध सापळे लावावेत किंवा क्लोरॅंट्रानिलीप्रोल १८.५% एससी ४ मिली किंवा क्लोरपायरीफॉस २०% एससी २० मिली किंवा सायपरमेथ्रीन १०% ईसी ११ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी.

**मिरची व गवार** :मिरची व गवार पिकावर पावडरी मिल्ड्यू रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी मायक्लोब्यूटॅनिल १०% डब्ल्यूपी १० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी.

भाजीपाला पिकात खुरपणी करून भाजीपाला पिक तण विरहीत ठेवावे व आवश्यकतेनुसार पाटाने पाणी द्यावे. काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकाची पिकाची काढणी करून घ्यावी.

# राज्यात चिकुनगुनियाचा फैलाव, रुग्ण वाढले; नागपूरमध्ये सर्वाधिक संसर्ग, मुंबई दुसऱ्या क्रमांकावर

## देशात १२,५८७ रुग्ण, त्यापैकी सर्वाधिक ४,७९२ रुग्ण महाराष्ट्रात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई १०**

राज्यात चिकुनगुनियाचे रुग्ण वाढले आहेत. गेल्या सहा वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक ५,७५७ रुग्ण २०२४ मध्ये सापडले आहेत. त्यात पहिल्या क्रमांकावर नागपूर शहर आणि दुसऱ्या क्रमांकावर मुंबई आहे. यंदा रुग्ण मोठ्या संख्येने वाढल्याने वैद्यकीय वर्तुळात तो चर्चेचा विषय झाला आहे.

चिकुनगुनिया हा विषाणूजन्य आजार एडिस इजिप्ती आणि एडिस अल्बोपिक्टस डासांच्या संक्रमित मादीपासून फैलावतो. डेंग्यूसारखी लक्षणे असली तरी या आजारासाठी भिन्न उपचारांची आवश्यकता असते. राज्याच्या आरोग्य विभागामार्फत रुग्ण शोधण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे.

महाराष्ट्रात सर्वाधिक रुग्ण

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने ऑक्टोबर २०२४ पर्यंत चिकुनगुनिया रुग्णांची माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार या आजाराचे १२,५८७ रुग्ण आढळून आले आहेत.



त्यामध्ये सर्वाधिक ४,७९२ रुग्ण महाराष्ट्रात आढळले. तर दुसऱ्या क्रमांकावर कर्नाटक आहे. तेथे २,२१३ रुग्ण आढळले आहेत.

लक्षणे काय?

रुग्णाला दोन ते बारा दिवस जास्त ताप येतो.

सांधे दुखतात, काही रुग्णांमध्ये वेदना अनेक आठवडे, महिनेही टिकतात.

सांध्यांना सूज येते.

आजारपणाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी अंगावर पुरळ येतो.डोकेदुखी, डोके दाबल्यासारखे जाणवते.यापूर्वी या आजाराचे रुग्ण राज्याच्या ग्रामीण भागात आढळत असत. आता मुंबईतही त्यांची संख्या वाढली आहे. या आजारात लक्षणानुसार औषध दिले जाते. आजूबाजूच्या परिसरात डास होणार नाही, याची दक्षता घ्या, डासांपासून संरक्षण करा. कुठल्याही प्रकारचा ताप आणि अंगदुखी असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. **- डॉ. विनायक सावर्डेकर**, सहयोगी प्राध्यापक, मेडिसिन विभाग, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण


# राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये गुरुवारी काम बंद आंदोलन

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.६अमरावती** –सरपंच आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी शासनाने कायदा करून ठोस उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी तसेच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ राज्यातील ग्रामपंचायतींत ९ जानेवारीला काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याचे पंचायतराज मंच संचलित अखिल भारतीय सरपंच परिषदेने जाहीर केले आहे.

अखिल भारतीय सरपंच परिषदेतर्फे संतोष देशमुख यांना राज्यातील प्रत्येक गावातील ग्रामपंचायतीत श्रद्धांजली वाहण्यात येऊन गुरुवारी (दि. ९) एक दिवस काम बंद आंदोलन करण्याचे परिषदेचे संस्थापक व प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील व राज्य सरचिटणीस विवेक ठाकरे, वरिष्ठ उपाध्यक्ष शशिकांत मोरे यांनी जाहीर केले आहे.या संदर्भातील निर्णय शासनाला कळविण्यात आला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना ई मेलद्वारे याबाबत मागणी निवेदन दिले आहे.सरपंच हा लोकसेवक असल्याबाबत तेलंगणा व राजस्थान उच्च न्यायालयासह सर्वोच्च न्यायालयाचाही निर्णय आहे. त्यानुसार सरपंचाच्या फिर्यादीवरून शासकीय कामात अडथळा आणला म्हणून पूर्वीचे भादंवि ३५३, आताचे भारत न्याय संहिता १३२ प्रमाणे गुन्हा नोंद व्हावा.गावाच्या हितासाठी समाजसेवेत भाग घेणाऱ्या सरपंचांना व त्यांना मदत करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण अत्यावश्यक असल्याचे या निवेदनात म्हटले आहे.




### सरपंच परिषदेच्या शासनाकडे मागण्या

सरपंच व ग्रामपंचायत कर्मचारी संरक्षण कायदा असावा.

प्रत्येक ग्रामसभेला पोलिस संरक्षण अनिवार्य करण्यात यावे.

सरपंचांना विमा संरक्षण व पेन्शन लागू व्हावी.

ग्रामसभा सर्व ग्रामस्थांसाठी असल्याने ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये इतरांना कायद्याने प्रतिबंध असावा.

# भाजपा सदस्य अभियानाला जिल्ह्यात ऐतिहासिक प्रतिसाद

## दर्यापूर विधानसभेत डॉ.अनिल बोंडे यांच्या बुथला भेटी

## उमरी, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी येथे जनप्रबोधनाचे कार्यक्रम



### भाजपचे सदस्य होण्याच आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती :** १०भाजपने संघटनात्मक दृष्ट्या उभारी घेण्यासाठी मोठ्या हालचाली सुरू केल्याचं दिसून येत आहे. संघटन पर्वा अंतर्गत अमरावती जिल्ह्यात भाजप सदस्य अभियानाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. खासदार तथा जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात १४ ही तालुक्यात हे अभियान व्यापकपणे राबविल्या जात आहे. त्या अंतर्गत बोंडे यांनी दर्यापूर विधानसभा क्षेत्रातील विविध बूथ स्तरावर भेटी देत भाजपच सदस्य होण्याचे आवाहन केले आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडताच भाजपने संघटनात्मक दृष्ट्या पक्षाला मजबूत करण्यासाठी युद्ध स्तरावर पाऊल उचलली आहेत. त्यानुसार अमरावती जिल्ह्यात भाजप सदस्य अभियानाला थाटात सुरुवात झालेली आहे. जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात अमरावती जिल्ह्यातील १४ ही तालुक्यात भाजप सदस्यता मोहीम युद्धस्थरावर सुरू करण्यात आली आहे. त्या अंतर्गत आज डॉ. अनिल बोंडे यांनी दर्यापूर विधानसभा क्षेत्रात येणाऱ्या उमरी मंदिर, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी यासह विविध ठिकाणी बूथ स्तरावर भेटी दिल्या. दरम्यान जनप्रबोधनाचे विविध कार्यक्रम घेण्यात आले. समाजाच्या प्रत्येक घटकाला न्याय देणारा एकमेव पक्ष म्हणून भाजप पक्ष आहे. त्यामुळे राष्ट्राच्या, देशाच्या आणि राज्याच्या उन्नतीसाठी भाजपच हा उत्तम पर्याय आहे असा आशावाद व्यक्त करताना डॉ. अनिल बोंडे यांनी प्रत्येकाने भाजपच सदस्यत्व घ्यावं असे आवाहन केले.

# लोकमत चे मोहनभाऊ राऊत यांना बाळशात्री जांभेकर दर्पण पत्रकारिता इंटरनॅशनल अवॉर्ड घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६धामणगाव रेल्वे**

मागील २५ वर्षा पेक्षा अधिक काळ पत्रकारिता क्षेत्रात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्रीडा विविध विभागात आपल्या लेखणीतून आगळा- वेगळा ठसा उमटविणारे सर्व सामान्य व आदिवासींना न्याय देण्याचे काम करणारे धामणगाव रेल्वे येथील लोकमत चे स्टार रिपोर्टर पत्रकार मोहनभाऊ राऊत यांना पत्रकार दिनाच्या पूर्वसंध्येला बाळशास्त्री जांभेकर दर्पण इंटरनॅशनल पुरस्कार घोषित करण्यात आला आहे २७ एप्रिल रोजी हा पुरस्कार मुंबईत राज्यातील वरिष्ठ पत्रकांराच्या हस्ते देण्यात येणार आहे .

धामणगाव तालुक्यातील रहिवाशी असलेले पत्रकार मोहन राऊत हे दोन तपा पेक्षा अधिक काळापासून पत्रकरिता क्षेत्रात कार्यरत आहे शासनाच्या विविध योजनेची अंमलबजावणी होतांना सर्व सामान्य माणसाला कितपत लाभ मिळतो यांचे वृत्तपत्रातून अनेक विषयांवर अभ्यासपूर्ण



लिखान ते करतात तसेच समाजातील अनेक प्रश्न चव्हाट्यावर आणण्याचे काम त्यांनी केले.जनतेमधील विकास विषयक जाणिवाच्या जागृतीसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळे त्यांना यंदाचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील बाळशास्त्री जांभेकर दर्पण पत्रकारिता पुरस्कार


समता साहित्य अकादमीच्या वतीने घोषित करण्यात आला आहे.

# सीईओ ची मेळघाट मधील सरप्राइज व्हिजीट

## शालेय पोषण आहाराची केली तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती,** मेळघाटमधील शिक्षण आणि आरोग्याच्या प्रश्न ऐरणीवर असतानाच शनिवारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी मेळघाटमधील काही प्राथमिक आरोग्यकेंद्रांसह धारणी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांना सकाळच्या वेळी सरप्राईज व्हिजीट दिल्यात. सीईओंच्या या अचानक भेटीमुळे आरोग्ययंत्रणा तसेच शिक्षण विभाग अलर्ट झाला. धारणीतील शाळांमधील परिस्थिती पाहून सीईओंनी कौतुकसुद्धा केले.



शनिवारी शासकीय सुटीचा दिवस असल्याने संपूर्ण यंत्रणा रिलॅक्स होती.खूद प्रशासन प्रमुख मेळघाटात असल्याची माहिती कुणालाच नव्हती. शनिवारी सकाळी आठ वाजता सीईओ संजिता संजिता महापात्र महापात्र या निवडक अधिकाऱ्यांसह धारणीत पोहोचल्या आणि त्यांनी प्राथमिक आरोग्यकेंद्राची पाहणी केली. तेथील व्यवस्थेचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी धारणी तालुक्यातील हरिसाल, बोरी, कोठा, जांबू आणि बासपानी या जिल्हा परिषद शाळांना भेटी दिल्यात.


जांबू येथील शाळेत पोहोचल्यानंतर त्यांनी शालेय पोषण आहाराची तपासणी केली. आहारामध्ये सोयाबीनच्या वड्या दिल्या जात असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. आहारामध्ये सोयाबीनसह शेवग्याच्या शेंगांचा समावेश करण्याची सूचना त्यांनी केली. सोबतच शासनाकडून प्राप्त झालेल्या 'मिलेटची चवसुद्धा चाखली. स्वयंपाकगृहाची पाहणीसुद्धा त्यांनी केली. याशिवाय वैयक्तिक व परिसर स्वच्छता, परसबागेची देखभाल या विषयावर विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. जांबू शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र घवळे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे स्वागत केले. शाळांमधील विद्यार्थ्यांची शिस्त व परिसरातील स्वच्छता पाहून सीईओंनी कौतुक केले.

# शहरातील दहा पोलिस ठाण्यांमध्ये स्पर्धाअंतर्गत व बाह्य स्वच्छतेचे काम सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** पोलिस आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या दहा पोलिस ठाण्यांमध्ये आता स्पर्धा होणार आहे. सोमवारी ठाण्यांचे तज्ज्ञांच्या चमूकडून परीक्षण केल्या जाणार आहे.

शहरामध्ये राजापेठ, गाडगेनगर,फ्रेजरपुरा, बडनेरा, शहर कोतवाली, नांदगावपेठ, वलगाव, भातकुली, खोलापुरीगेट व नागपुरीगेट, अशी एकूण दहा पोलिस ठाणे आहेत. त्यापैकी तीन ठाण्यांच्या इमारती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काही वर्षांपूर्वी बांधलेल्या असून, गाडगेनगर पोलिस ठाणे हे शासकीस ज्ञानविज्ञान संस्थेच्या इमारतीत सुरू आहे. उर्वरित ठाण्यांच्या इमारती या अजूनही इंग्रजकालीन आहेत. सद्य:स्थितीतपोलिस स्थापना दिवसानिमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन शहरात सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून पोलिस ठाण्यातील अंतर्गत व बाह्यस्वच्छतेबाबत स्पर्धा घेऊन त्या ठाण्यांना प्रथम, द्वितीयआणि तृतीय क्रमांक दिल्या जाणार आहे. त्यासाठी दहाही पोलिस ठाण्यांमध्ये शनिवारपासून (ता. चार) रंगरंगोटी, डागडूजी, जाण्याकरिता रस्त्यांची तात्पुरती व्यवस्था सुरळीत करण्याच्यादृष्टीने लगबग सुरू आहे. बहुतांश पोलिस



ठाण्यांमध्ये मालखाना हा एक विशेष विभाग असतो. त्यामध्ये गुन्ह्यातील आणि जप्तीच्या बऱ्याच वस्तू संबंधित प्रकरणांचा निकाल लागेपर्यंत साठवून ठेवल्या जातात. कामाचा, लोकसंख्येचा आणि वाढत्या गुन्ह्यांचा व्याप लक्षात घेता बऱ्याच ठाण्यांत कर्मचाऱ्यांना बसायला, काम करायलासुद्धा जागा अपुरी पडत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आहे त्या व्यवस्थेत चांगल्या दर्जाचे पोलिसिंग व्हावे, याकरिता पोलिस रेनिंग डे सप्ताहाच्या अनुषंगाने अंतर्गत व बाह्य स्वच्छता चांगली करण्याचा मानस वरिष्ठांचा होता.

तशा सूचना ठाण्यांच्या अधिकाऱ्यांना देऊन त्यांना प्रथम, द्वितीयव तृतीय क्रमांक दिल्या जाणार आहे. सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे व सहायक पोलिस आयुक्त श्री. खटाळे यांच्या नेतृत्वात दोन निरीक्षण समित्यांचे गठण करण्यात आले. तेच अधिकारी दहाही ठाण्यांचे निरीक्षण करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक ठाण्याला देणार आहेत.

## नांदगाव पेठ येथे खासदार रक्तदान महायज्ञ अंतर्गत भव्य रक्तदान शिबिर

# शक्ती, बुद्धी, सेवा अन् अध्यात्माचे केंद्र म्हणून काशिनाथबाबा धाम लौकिक मिळवेल

### खासदार डॉ.अनिल बोंडे यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती :** ४काशिनाथ बाबा धाम शक्ती, बुद्धी, सेवा आणि अध्यात्माच केंद्र म्हणून येत्या काळात लौकिक मिळवेल, असे प्रतिपादन राज्यसभेचे खासदार भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांनी केले. नांदगाव पेठ येथील श्री संत काशिनाथ बाबा पुण्यतिथी महोत्सव निमित्त आयोजित भागवत सप्ताहमध्ये सतत ३६५ दिवस खासदार रक्तदान मोहीम अंतर्गत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. रक्तदान आयोजन समिती व रक्तदात्यांचा डॉ.अनिल बोंडे यांनी दरम्यान सन्मान केला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, रक्तदान हेच श्रेष्ठ दान आहे. सेवेचा वसा आणि वारसा आपल्याला अखंडितपणे समोर घेऊन जायचं आहे. ही बाब लक्षात घेता सतत ३६५ दिवस खासदार रक्तदान महायज्ञ सुरू करण्यात आलेला आहे. संपूर्ण अमरावती शहर व जिल्ह्यातून त्याला व्यापक प्रतिसाद मिळत आहे. आगामी काळात शासकीय रुग्णालयांना रक्ताचा जो तुटवडा निर्माण होतो ती संपूर्ण अडचण यामुळे सोडवण्यास मदत होईल असेही ते म्हणाले. यावेळी, भाजपा सचिव सत्यजितसिंह राठौड, संत काशीनाथ बाबा संस्थान अध्यक्ष विपुल पालीवाल, संदीप यावले, मनीष




दुधे, मोनूसिंह राठौड, गजानन इंगळे, उदयसिंह चंदेल, संदीप अकोलकर, गौरव राठौड,गजानन भगत, संजयजी पकडे, रवींद्र राऊत, रूपेश पोटफोडे, रामकलीताई वैष्णव, सिंधुताई डोईफोडे, प्रशांत इंगोले, कन्हैया गहरवार, करण चव्हाण, गोदु बैस यांच्यासह अन्य उपस्थित होते.

# जिल्ह्यातील २० गावांमधील भूजल पातळी खालावली

## वरुड, नांदगाव खंडेश्वर, मोर्शी, अचलपूर, भातकुली, चांदूर बाजार, चिखलदरा, धारणी या भागात परिस्थिती चिंताजनक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–**

जिल्ह्यातील वरुड,नांदगाव खंडेश्वर, मोर्शी, अचलपूर, भातकुली, चांदूरबाजार, चिखलदरा, धारणी या तालुक्यातील २० गावांमधील भूजल पातळी खालावली आहे. काही ठिकाणी भूजल पातळी २० मीटरपेक्षा जास्त खाली गेल्याचे जिल्ह्यातील १७१ विहिरींच्या नोंदविलेल्या निरीक्षणातून ही बाब समोर आलेली आले.

जलविज्ञान प्रकल्पांतर्गत मॉर्कोलॉजिकल वर्गीकरणाच्या आधारे १७१ निरीक्षण विहिरी निवडण्यात आल्या आहेत. ऑक्टोबर, डिसेंबर, मार्च आणि मेमध्ये त्याचे मॅन्युअली त्रैमासिक निरीक्षण केले जाते. याव्यतिरिक्त, समांतर आणि खोल पाण्याच्या पातळीचे मासिक निरीक्षण करण्यासाठी ५५ पायझोमीटर ड्रिल

केले गेले आहेत आणि हा डेटा जीईएमएस वेबसाइटवर अद्ययावत केला जातो. या माहितीचा वापर भूगर्भातील पाण्याच्या गुणवत्तेच्या पुढील अभ्यासासाठी आणि निरीक्षण प्रणालीसाठी केला जात आहे. या अभ्यासासाठी १५० पाणी गुणवत्ता केंद्रांची निवड करण्यात आली. जे पाण्याच्या गुणवत्तेच्या आधारावर बीएस-स्टेशन, टीएस-स्टेशन आणि टी-स्टेशनमध्ये विभागले गेले. रासायनिक जिवाणू विश्लेषणासाठी दरवर्षी पाण्याचे नमुने घेतले जातात.

भूजल सर्वेक्षण विभागाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक राजेश सावळे यांनी सांगितले की, जिल्ह्याचा उत्तरेकडील भाग हा बहुतांशी डोंगराळ असून तो जंगलांनी वेढलेला आहे. उत्तर- पश्चिम भाग घनदाट सागवान जंगलाने व्यापलेला आहे. मध्यवर्ती भाग शुद्ध जलोदराने




झाकलेला आहे, एकूण क्षेत्रफळ ३०५३ चौरस किलोमीटर आहे. उतार ९ मीटर खोल ते १५ किलोमीटरपर्यंत आहे. ईडब्ल्यू उतार१५ मीटर खोल ते १५ किलोमीटरपर्यंत आहे. पूर्णा जलोदरामध्ये गाळ, चिकणमाती, वाळू यांचा समावेश होतो. तर सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्याशी माती, दगड आणि खडे आहेत.या क्षेत्राची एकूण व्याप्ती २५ टक्के आहे. तर इतर ७५ टक्के क्षेत्र डेक्कन ट्रॅप आहे. जे बहुतेक जोडलेले, वेसिक्युलर बेसाल्ट प्रकारचे असते. अमरावती जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १२,२१२ चौरस किलोमीटर असून ते महाराष्ट्राच्या केवळ ३.९७ टक्के आहे. अमरावती जिल्ह्याचा ७५

टक्के भाग डेक्कन ट्रॅपने व्यापलेला आहे तर २५ टक्के क्षेत्र पूर्णा ल्युव्हियमने व्यापलेले आहे. पूर्णा ल्युव्हियमचे एकूण क्षेत्रफळ ३,०५३ चौरस किलोमीटर आहे. त्यापैकी १,५६२ चौरस किलोमीटर क्षारपड क्षेत्राशी संबंधित आहे. जे गुणवत्ता प्रभावित क्षेत्र आहे. या भागात सिंचन आणि पिण्याच्या पाण्यासाठी भूजलाचा वापर होत नाही. तर जिल्ह्याच्या उत्तर-पूर्व भागात प्रामुख्याने संत्रा पिकाला जास्त पाणी दिले जाते. ज्यामुळे भूजलात असंतुलन निर्माण होते.

# ४ हजार मालमत्ताधारक महापालिकेच्या रडारवर !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती :** मालमत्ताकर थकीत ठेवणाऱ्या तब्बल ४ हजार ६०० पेक्षा अधिक मालताधारकांना महापालिका प्रशासनाकडून नोटीस पाठविण्यात आल्या आहे. या मालमत्ताधारकांनी मुदतीत कर न भरल्यास मालमत्ता जप्तीची कारवाई केल्या जाऊ शकते, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. दरम्यान, १ जानेवारीपासून आधीच थकबाकीदार मालमत्ताधारकांना प्रतिमाह दोन टक्के अर्थात वार्षिक २४ टक्के दंड लागू, झाला आहे.

महापालिकेने २०२३-२४ मध्ये नव्याने मालमत्ता सर्वेक्षण व मूल्यांकनकरून वाढीव दर लागू केले होते; मात्र त्यामुळे मालमत्ताधारकांमध्ये पसरलेली नाराजी लक्षात घेता सर्व राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांनीही या वाढीव दराला विरोध केला. त्यानंतर आ. सुलभा खोडके यांच्या पाठपुराव्यानुसार राज्यशासनाने वाढीव दराला तूर्तास स्थगिती दिली. त्यामुळे आता २००५ या वर्षातील जुनेच दर लागू करण्यात आले आहे. विशेष म्हणजे २०२३-२४ मध्ये नवीन दरानुसारही कर भरणाऱ्यांमध्ये



बहुतांश मालमत्ताधारक मध्यमवर्गीय होते. त्यांच्या कराच्या उर्वरित रकमेचे यावर्षीच्या करात समायोजन करण्यात येत आहे; मात्र साधारणतः उच्च मध्यमवर्गीय व प्रामुख्याने उच्चभ्र् वर्गातील मालमत्ताधारकांकडूनच कर भरण्यासाठी फारसा प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे आता जुन्या दरानुसार का होईना, पण करवसुली करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. त्यासाठी सुटीच्या दिवशीही शिबिरे आयोजित केल्या जात असून, कराचा भरणा करण्यासाठी ऑफलाइन व ऑनलाइन असे वेगवेगळे अनेक पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यानंतर आता किमान ५०हजार रुपये व त्यापेक्षा अधिक कर थकीत असणाऱ्या ४ हजार ६०० पेक्षा अधिक मालमत्ताधारकांना इशारावजा नोटीस देण्यात आली आहे. या नोटीसला त्यांनी प्रतिसाद दिला नाही, तर दुसऱ्यांदा जप्तीची नोटीस देण्यात येईल. त्यानंतरही प्रतिसाद दिला नाही, तर मात्र बेट जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती कर मूल्यांकन विभागाकडून देण्यात आली. दरम्यान, महापालिकेच्या तिजोरीत सध्या ठणठणाट असल्याने साफसफाई सह विविध विकासकामांनाही बेक लागला आहे. त्यामुळे प्रशासनाकडून मालमत्ता धारकांना कर भरण्यासाठो आवाहन करण्यात येत आहे.

# आरक्षणाची गरज नाही, जिथे जाऊ तिकडे आपलं स्थान निर्माण करू

## भाजप नेते माधव भंडारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई -** ब्राम्हण समाजाने कोणताही न्यूनगंड बाळगण्याची गरज नाही. स्वतंत्र भारताच्या जडणघडणीत ब्राह्मण समाजाचा वाटा दुर्लक्ष करण्यासारखा नाही. देशातील उद्योगांच्या उभारणीत ब्राह्मण समाजाचे योगदान खूप मोठं आहे. देशात समाज सुधारण्यासाठीच्या चळवळी झाल्या, त्या उभ्या करणारे बहुतेक ब्राह्मण होते. यामुळे आपल्याला आरक्षणाची गरज नाही, आम्ही जिथे जाऊ तिथे स्थान निर्माण करू; असे मत भाजप नेते माधव भंडारी यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजातील नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा भव्य सत्कार सोहळा कल्याणमध्ये आयोजित करण्यात आला होता. कल्याण ब्राम्हण सभे तर्फे कल्याणच्या आचार्य अत्रे सभागृहात सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आमदार किरण सामंत, संजय केळकर, भाजप नेते माधव भंडारी, सांगलीचे आमदार सुधीर गाडगिळ, परशुराम आर्थिक विकास महामंडळ अध्यक्ष आशिष दामले, बोरिवली आमदार संजय उपाध्याय, उल्हासनगरचे आमदार कुमार आयलानी यांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना भाजप नेते माधव भंडारी यांनी बोलताना सांगितले, की राजकारणामध्ये संख्येचा आणि पैशांचा टक्का बघितला जातो, जो पर्यंत आपलं टक्का वाढवत नाही. आपली रेश वाढवत नाही, तोपर्यंत आपल्याला अपेक्षित



असलेले यश मिळत नाही. आपण आता साडेदहा अकरा टक्क्यांच्या घरात आहोत. गेल्या काही वर्षात ज्या पद्धतीने आपल्या समाजाचा अपमान करण्याची मोहीम एका विशिष्ट वर्गाकडून सुरू आहे ते पाहिल्यानंतर आता गप्प राहून चालणार नाही. पूर्वीचा इतिहास काय त्या चर्चेला काही अर्थ नाही, हे फक्त आपल्याबद्दलच नाही. मात्र समाजातील कोणत्याही घटकाबद्दल जर असा अपमान, वागणं सहन करावा लागत असेल तर योग्य नाही. आपण ब्राह्मण म्हणून कोणताही न्यूनगंड बाळगण्याची गरज नाही. खेड्यापाड्यात राहणाऱ्या एकट्या ब्राह्मणाला संरक्षणाची गरज आहे. त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याची गरज आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी आपले वजन वापरण्याची गरज. परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी २०० कोटी मागितले पाहिजे, अशी मागणी भंडारी यांनी परशुराम आर्थिक विकास महामंडळ अध्यक्ष आशिष दामले यांच्याकडे केली.

# धाडसी करीना थापाचा शिवसेनेने केला सत्कार

## सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने सन्मानपत्र देऊन केला गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती-**क्रांती जोती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने आग लागलेल्या फ्लॅटमध्ये स्वतःच्या जीवाची परवा न करता सत्तर कुटुंबाचे रक्षण करणाऱ्या धाडसी करीना थापा हिचा ठाकरे गटाच्या शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी करीनाच्या राहत्या घरी जाऊन सन्मानपत्र शॉल पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला

अमरावती शहरातील कठोरा परिसरातील पोतदार इंटरनॅशनल स्कूल जवळील जय अंबा अपार्टमेंट मध्ये काही दिवसा पूर्वी सायंकाळ दरम्यान अपार्टमेंटच्या बी विंग मधील दुसऱ्या माळ्यावरील फ्लॅटमधून धूर निघत होता शेजारी राहणाऱ्या सतरा वर्षीय करीना थापाने बंद असलेल्या फ्लॅटचे कुलूप तोडून आत जाण्याचा प्रयत्न करतांना आगीचे आणि धुराचे लोट येत असतांना त्या आगीवर सतत पाणी फेकत सिलेंडर जवळील आग आटोक्यात आणली आणि गरम सिलेंडर बाहेर काढले या दरम्यान



सिलेंडरचा स्फोट सुद्धा होऊ शकला असता करीना थापाच्या समय सूचकते मुळे मोठा अनर्थ टाळला त्यामुळे अपार्टमेंटचे रक्षण झाले त्यामुळे या सर्व घटनेत समयसूचकता व धाडस करणाऱ्या करीनाच्या धाडसी कार्याची प्रशासनाने दखल घेत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित केले म्हणून तिचे सर्व स्तरावरून अभिनंदन व कौतुक केले जात आहे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने करीना थापा तिची आई व वडील यांचा त्यांच्या राहत्या घरी जाऊन सत्कार केला यावेळी माजी जी प उपाध्यक्ष बाळासाहेब भागवत माजी जिल्हाप्रमुख प्रकाश मारोटकर विधानसभा संघटक बाळासाहेब राणे विष्णुपंत तिरमारे शहर प्रमुख निलेश इखार पवन शिरभाते साहाय्यक निबंधक योगेश जयस्वाल इत्यादी उपस्थित होते.-

# खंडणीसाठी धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर बैठक

## माहिती खोटी ठरल्यास राजकारण सोडतो; सुरेश धस यांचं चॅलेंज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६बीड-** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या




आरोपींना अटक करून कठोर शिक्षा देण्याच्या मागणीसाठी पुणे शहरात सर्वपक्षीय मोर्चाचं आयोजन करण्यात आलं होतं. या मोर्चावेळी केलेल्या भाषणात भाजप आमदार सुरेश धस यांनी राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. पवनचक्की कंपनीकडे खंडणी मागण्यासाठी धनंजय मुंडे यांच्या सरकारी बंगल्यावर बैठक झाली होती आणि नंतर निवडणुकीसाठी या कंपनीकडून ५० लाख रुपये घेण्यात आले, असा आरोप सुरेश धस यांनी केला आहे.

धनंजय मुंडेंवर आरोप करताना तारखांचा उल्लेख करत सुरेश धस म्हणाले की, १४ जून रोजी अवादा कंपनीचे अधिकारी आणि वाल्मीक कराड, नितीन बिक्कड यांची मुंडेंच्या परळीतील बंगल्यावर बैठक झाली. या बैठकीनंतर थेट धनंजय मुंडे यांची भेट घेण्यासाठी अवादा कंपनीच्या शुक्ला नावाचा अधिकारी मुंडे यांचे स्वीय सहाय्यक प्रशांत जोशी यांच्याकडे प्रयत्न करत होते. मला डावलून थेट धनंजय मुंडेंची भेट घेण्याचा प्रयत्न केल्याने ही बाब वाल्मीक कराडला खटकली. त्यामुळे वाल्मीकने जोशीला खडसावलं आणि त्यानंतर १९ जून रोजी अवादा कंपनी आणि आय एनर्जी या कंपनीच्या अधिकाऱ्यांची धनंजय मुंडे यांच्या मुंबईतील बंगल्यावर बैठक झाली. या बैठकीत कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे तीन कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली. त्यानंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आपल्या वरिष्ठांना ही बाब फोनवर सांगितली. वरिष्ठांनी तीन कोटींऐवजी दोन कोटी रुपये देण्यास सहमत दाखवली. त्यानंतर निवडणुकीसाठी आता लगेच ५० लाख रुपये द्या, अशी मागणी कंपनीकडे करण्यात आली आणि कंपनीने यांना ५० लाख रुपये दिले. हे पैसे तेव्हा धनंजय मुंडेंनी घेतले की वाल्मीक कराड याने हे मला माहीत नाही. धनंजय मुंडे यांच्या सरकारी बंगल्यावर खंडणीसाठी बैठका झाल्या, असा गंभीर आरोप सुरेश धस यांनी केला आहे.

### ...तर मी राजकारण सोडतो

अजितदादा मी तुमच्या पाया पडतो, तुमचं काय अडकलंय धनंजय मुंडेंकडे? त्यांना जाऊ द्या मंत्रिमंडळातून बाहेर. ते सातपुडा या सरकारी बंगल्यावर खंडणीसाठी बैठका घेत आहेत. ही माहिती खोटी निघाली तर मी राजकारण सोडेन. माझ्याकडे आता ३०० गायींचा गोठा आहे, राजकारण सोडून तो १००० गायींचा गोठा करेन. माझी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांना विनंती आहे की,या गोष्टीचा छडा लावा आणि प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळातून बाहेर काढा, असं आवाहनही सुरेश धस यांनी केलं आहे.

# अखवा देश शिर्डीत येऊन फुकट जेवतोय, सगळे भिकारी...

## सुजय विखेंचं धक्कादायक विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अहिल्यानगर -** शिर्डी संस्थानाकडून प्रसादालयात मोफत जेवण दिले जाते. तिथे २५ रुपये आकारणी करा. त्यातून मिळणारा पैसा शिर्डीतील मुलांच्या भविष्यासाठी खर्च करा. अख्खा देश येऊन शिर्डीत फुकट जेवतोय, महाराष्ट्रातले सगळे भिकारी इथं गोळा झालेत असं धक्कादायक विधान भाजपा नेते माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी केले आहे. शिर्डी परिक्रमा उपक्रमाच्या नियोजनासाठी आयोजित कार्यक्रमात सुजय विखे पाटील बोलत होते.

तसेच जेव्हा जेव्हा आमच्या मुलांच्या भवितव्याचा प्रश्न असेल तेव्हा शिर्डीतील कुठल्याही पक्षाचा माणूस तुम्हाला विरोध करणार नाही. सीबीएसईचं शिक्षण शिर्डीतील मुलांमुलींना मोफत झाले पाहिजे. माणूस शिकला तर तो योग्य मतदार होऊ शकेल. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत बैठक लावू. त्यात शिर्डीचा विकास यावर चर्चा करू. संस्थानाचा पैसा शिर्डीच्या विकासासाठी खर्च झाला पाहिजे. शिक्षण समृद्ध करा. इंग्लिश शिकवणाऱ्याला इंग्रजी येत नाही. तो मराठीत इंग्रजी शिकवतो. हे योग्य नाही. प्रसादालयात मोफत जेवण बंद करावं अशी मागणी सुजय विखे पाटील यांनी केली.

दरम्यान, प्रसादालयात येणारा कुणीही गरीब नाही. १० रुपयेचं जेवण प्रत्येकजण खाऊ शकतो.



जे पैसे अन्नदानात खर्च होतात तो पैसा आमच्या मुलामुलींच्या भविष्यासाठी खर्च करा हीच आमची मागणी आहे. शिर्डीच्या अर्थकारणाला चालना मिळाली पाहिजे. आपल्याला २-३ गोष्टी आवश्य कराव्या लागतील. संस्थानाचा पैसा खर्च होतोय, त्याची परतफेड या भूमीत जन्मलेल्या माणसाच्या उपजीविकेचे साधन व्हावे हे आपल्याला करायचे आहे. शिर्डीत संस्थानाकडून हॉस्पिटल बांधण्याचा निर्णय झाला. बांधू शकता पण ही शिर्डीकरांची गरज नाही. शिक्षण संकुल जसं बांधले तसे कोचिंग सेंटर उभारून आपला मुलगा स्पर्धा परिक्षेत पास झाला पाहिजे. फक्त आणि फक्त शिर्डी आणि पंचक्रोशीतील मुलांसाठी हे उघडले पाहिजे. आपण दवाखाना उघडला तिथे २५ टक्केच स्थानिक लाभ घेतात, बाकी ७५ टक्के बाहेरचे आहेत असंही सुजय विखे पाटील यांनी सांगितले. पगारावर खर्च होऊ द्या पण १२ वी पास झालेल्या मुलाला उत्कृष्ट इंग्लिश बोलता आलं पाहिजे अशी शिक्षण सुविधा दिली पाहिजे अन्यथा काही उपयोग नाही.

### शिवसेनेने सुजय विखेंच्या मागणीचा केला निषेध

जगभरातून साईभक्त शिर्डीत येतात. ते श्रद्धेपोटी तिथे येतात. कोट्यवधीची देणगी देतात. भाविक जेवणासाठी तिथे येत नाहीत. अन्नदान हे चांगले काम आहे. त्यांच्याकडून पैसे घेण्याची मागणी करणे गैर आहे. भिकारी तिथे येतात आणि जेवतात हे म्हणणे म्हणजे साईभक्तांचा अपमान करण्यासारखं आहे असं सांगत सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सुजय विखे यांच्या विधानाचा निषेध केला आहे.

# भाजपने विरोधीपक्षच ठेवला नाही- बच्चू कडू

## तर भाजप-ठाकरे यांच्यात नवी प्रेम कहाणी सुरू होईल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती** राज्याची अतिशय वाईट अवस्था आहे. याराज्यामध्ये भाजपने विरोधी पक्ष ठेवलेला नाही. ज्या दोघांना घेतले त्यांना पण ठेवले नाही, मित्र पक्ष पण गायब, विरोधी पक्ष पण गायब आता फक्त भाजपचे राज्य आहे. भाजप शिवाय आता या राज्यात, देशामध्ये काहीच होऊ शकत नाही, असा निशाणा बच्चू कडू यांनी भाजपवर साधला. माध्यमांशी बोलताना त्यांनी भाजपच्या नितीवर हल्लाबोल केला.



भाजपचा अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत प्रेमभंग झाला, तर राज्यात भाजप आणि ठाकरे गटात नवीन प्रेम कहाणी सुरू होऊ शकते, असे वक्तव्य कडू यांनी केले आहे. बच्च कडू यांच्या वक्तव्यानंतर अनेकांच्या भुवया उंचवल्य आहेत.

भाजप ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चेबाबत विचारलेअसता बच्चू कडू म्हणाले, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत भाजपचा प्रेमभंग झाला, तर उद्धव ठाकरेंसोबत भाजपची नवीन प्रेमाची कहाणी सुरू होऊ शकते. त्यासाठी त्यांचा प्रयत्न असेल. मोठ्या माशांखाली लहान मासे असतात, ते मोठ्या माशाला कुरतडून खात असतात. पण एक दिवस असा येतो की हा मोठा मासा लहान माशांना पूर्ण नष्ट करतो, अशी भाजपची एकंदरीत रणनीती आहे. या निवडणुकीत विरोधक तर खल्लास झाले. मित्र पक्ष देखील केवळ दिसायला युतीत आहेत. पण अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या अंतर्मनाला विचारले, तर त्यांचे भाजपबद्दल अंतर्मन काय आहे, हे लक्षात येईल. यांची नार्को टेस्ट झाली, तर भाजपबद्दल त्यांच्या मनात काय आहे, हे अजित पवार आणि एकनाथ शिंदे नक्की सांगतील, असाही टोला बच्चू कडू यांनी लगावला.

# कस्तुरबा इंग्लिश स्कूल मध्ये क्रीडा महोत्सव संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती-** स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित कस्तुरबा इंग्लिश स्कूलमध्ये भारतातील पहिल्या शिक्षिका, मुख्याध्यापिका, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, विद्येची जननी व समस्त स्त्रियांना उजेडाची वाट दाखवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून क्रीडा महोत्सव साजरा करण्यात आला. शाळा स्तरावर घेण्यात आलेल्या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण या दिनी करण्यात आले. हा कार्यक्रम दोन टप्प्यात घेण्यात आला.

इयत्ता नर्सरी ते इयत्ता तिसरी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल मेडल व त्यांचा सत्कार करण्यात आला. या दरम्यान इयत्ता चौथी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मेडल व त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला उपस्थित श्री नरेश पाटील सर (स्वीकृत सदस्य- श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व अध्यक्ष- पंजाबराव को-ऑपरेटिव्ह बँक अमरावती) बी.के.कडू सर (ओ.एस.डी. व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद), श्री एकनाथराव गावंडे( श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद), श्री काकड सर( श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद),डॉ. स्वाती प्रशांत कोठे मॅडम( प्रोफेसर- वाय. डी. बी. डी. कॉलेज, तिवसा.) तसेच श्री प्रशांत कोठे सर( प्राचार्य- धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर.) इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.नुकत्याच झालेल्या डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब



देशमुख यांच्या जयंतीनिमित्त शारीरिक शिक्षण महाविद्यालय,अमरावती., येथे झालेल्या आंतरशालेय विविध खेळातील स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. यामध्ये विदर्भातील सर्व शिवाजी शिक्षण संस्थेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये कस्तुरबा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सर्व क्षेत्रात बाजी मारून शाळेला नावलौकिक प्राप्त करून बक्षीस सुद्धा मिळविले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शाळेचे, विद्यार्थ्यांचे तसेच शाळेचा आधारस्तंभ असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती साधना चंदेल मॅडम यांचे भरभरून कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.तसेच क्रीडा शिक्षक विकास रुईकर सर व स्नेहा सावरकर मॅडम यांचे सुद्धा कौतुक केले.

कार्यक्रमाचे संचालन रितू तलमले व आभार प्रदर्शन लतिका पाटील मॅडम यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# आदिवासी समाजातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी शासन प्रयत्नशिल - देवेंद्र फडणवीस

## आदिवासी विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाह व्यापण्यासाठी राज्य शासनाचे प्रयत्न : आदिवासी कल्याणाच्या सर्व उपक्रमांसाठी राज्यशासन भक्कमपणे पाठीशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नागपूर**

आदिवासींमध्ये उपजतच क्रीडा गुण असतात. त्याला स्पर्धात्मक वातारवण ,तंत्रशुद्धता आणि कौशल्याची जोड देवून आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यवसायीक खेळाडू घडविण्यासाठी केंद्र व राज्य शासन प्रयत्न करीत आहे. आदिवासी मुला-मुलींमध्ये मुख्य प्रवाह व्यापण्याची शक्ती निर्माण होत आहे यास अधिक वेग देण्यासाठीही राज्य शासन प्रयत्न करीत आहे. आदिवासींच्या कल्याणासाठी राबवायच्या सर्व नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी राज्य शासन भक्कमपणे आदिवासी विभागाच्या पाठीशी आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.



आदिवासी विकास विभागाच्यावतीने येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित तीन दिवसीय राज्य स्तरीय क्रीडा स्पर्धेच्या समारोप व बक्षिस वितरण समारंभा प्रसंगी मुख्यमंत्री श्री फडणवीस बोलत होते. आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके, विभागाचे सचिव विजय वाघमारे, आदिवासी विकास विभाग नागपूरचे अपर आयुक्त रविंद्र ठाकरे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, गेल्या काही वर्षांमध्ये आदिवासी समाजातील खेळाडुंनी धनुर्विद्या,ॲथलॅटिक्स आणि देशी खेळांमध्ये चमकदार कामगिरी केल्याचे चित्र देशभर दिसून येत आहे. आदिवासींमध्ये उपजतच विविध क्रीडा गुण असतात या गुणांना स्पर्धात्मक वातावरण,तंत्रशुद्धता व कौशल्य आधारीत उत्तम प्रशिक्षण देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध योजना आखल्या आहेत. याद्वारे आंतरराष्ट्रीय दर्जाचे उत्तम व्यावसायिक खेळाडू येणाऱ्या काळात या समाजातून निर्माण होतील.

राज्याचा आदिवासी विभाग आणि आश्रमशाळांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न सुरु असल्याचे सांगत मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले,आदिवासी मुलांसाठी राज्यशासनाने नामांकित शाळांची योजना विस्तारीत करून त्यांना चांगल्या शाळांमध्ये शिकण्याची सोय करून दिली. स्वयम्? योजनेच्या माध्यमातून वसतीगृहात प्रवेश न मिळू शकलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण सोडावे लागू नये यासाठी उत्तम कार्य सुरु आहे. निसर्गाचे रक्षक असणाऱ्या आदिवासिंना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य्? शासनाने विविध संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. आदिवासी मुल-मुलींमध्ये मुख्य प्रवाह व्यापण्याची शक्ती निर्माण होत आहे. ही शक्ती अधिक वेगाने निर्माण होण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करेल. तसेच आदिवासींच्या कल्याणासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याकरिता राजय्? शासन भक्कमपणे आदिवासी विभागाच्या पाठिशी उभा असल्याचेही त्यांनी सांगितले.

**नाशिक विभाग राज्यात प्रथम तर नागपूर उपविजेता, मुख्यमंत्र्याच्या हस्ते सन्मान**

राज्यातील ठाणे,नाशिक,अमरावती आणि नागपूर विभागांमध्ये ३ ते ५ जानेवारी २०२५ दरम्यान वैयक्तिक आणि सांघिक क्रीडा प्रकारात विविध स्पर्धा पार पडल्या. यात ४७५ गुणांसह नाशिक विभागाने प्रथम क्रमांक पटकाविला. नागपूर विभाग ४५४ गुणांसह दुसऱ्या तर २८१ गुणांसह ठाणे विभागाने तिसऱ्या क्रमांकाचे बक्षिस पटकाविले. मुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या हस्ते या तिन्ही संघाना यावेळी बक्षिस वितरीत करण्यात आले.

या स्पर्धेत एकूण ९७४ मुल आणि ९०० मुलींनी सहभाग घेतला. या स्पर्धेचे उर्वरीत बक्षिसे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके आणि वित्त व नियोजन राज्य मंत्री ॲड आशिष जयस्वाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

तत्पूर्वी, राज्यघटनेची ७५ कलमे मुखोद्गत असणारा शिवांश असराम, झिरो माईल आयकॉन सुप्रिया कुमार यांच्यासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी सुरेश पुजारी,स्वप्निल मसराम आदींचा यावेळी मुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नागपूर विभागातील शासकीय आश्रमशाळांमध्ये राबविल्या जात असलेल्या 'ब्राइटर माइंड' उपक्रमांतर्गत डोळयाला पट्टी बांधून रंग ओळखणे, पुस्तक वाचने,मोबाईलवरील फोटो ओळखने आदिंचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. उर्सुला शाळेच्या विद्यार्थीनींनी आदिवासी नृत्य सादर केले. आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी प्रास्ताविक केले.

# रेशीम पार्कमध्ये आढळला ११ फुटाचा अजगर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ बडनेरा**

प्रादेशिक रेशीम कार्यालय बडनेरा येथील दिनांक २७ डिसेंबर रोजी सकाळी मजूर नेहमीप्रमाणे काम करत असताना टसर रेशीम वन्य सिल्क अर्जुना बागेत गवत कापण्याचे काम करत असताना मजूर अजय जाधव यांना हा अजगर दिसला मजुरांनी सहाय्यक संचालक हेमंत लांडगांवकर यांना याची माहिती दिली तसेच तिथे उपस्थित असलेले नागपूर येथील रेशीम चे उपसंचालक डॉक्टर महेंद्र ढवळे हे पण उपस्थित होते यांनी वेळ न करता बडनेरा येथील ऋतिक ढोके या सर्व मित्राला फोनवर माहिती दिली व या अजगरा पकडण्यास बोलवले ऋतिक डोके यांनी या अजगराला पकडून फॉरेस्ट डिपार्टमेंटला याची माहिती दिली व कोंडेश्वर जंगलातील या अजगराला सोडण्यात आले यावेळी रेशीम प्रादेशिक कार्यालय येथील सर्व कर्मचारी सुटकेचा श्वास सोडला.

# बच्चू कडू यांच्या महाआरोग्य शिबिराचा हजारो महिलांनी घेतला लाभ

## राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिलांकरिता महाआरोग्य शिबिर व मोफत शस्त्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६चांदुर बाजार**

राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्य प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने जीवन आधार संस्था व शालिनीताई मेघे रुग्णालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांकरिता महाआरोग्य शिबीर व मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे चांदुर बाजार येथे आयोजन करण्यात आले होते.अचलपूर मतदार संघातील हजारो महिलांनी यावेळी या महाआरोग्य शिबिराचा लाभ घेतला तर यामधील १२३ महिला रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. गोरगरीब,दिव्यांग,अनाथ, शेतकरीगरजवंतांना नेहमी मदतीचा आधार देणारे व गोरगरिबांचे कैवारी म्हणून ओळख असलेले प्रहार



जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू अनेक वर्षांपासून आरोग्याची वारी आपल्या मतदार संघात राबवित असतात. राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रहार जनशक्ती पक्ष, जीवन आधार सामजिक संस्था व शालिनीताई मेघे हॉस्पिटल नागपूर यांच्या माध्यमातून नगरपरिषद उर्दु स्कूल चांदुर बाजार येथे गोर गरीब शेतकरी , महिला भगिनी यांच्या आरोग्यासाठी व यांना सर्व मोफत आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात याकरीता चांदूरबाजार मध्ये नगरपरिषद उर्दु महाविद्यालय मध्ये महाआरोग्य कॅम्प व रक्तदान शिबीर राबविण्यात आले या ठिकाणी सर्व आजराचे वैद्यकीय तज्ञ उपलब्ध करण्यात आले होते. या महाआरोग्य कॅम्प मध्ये सर्वांचे मोफत तपासणी करून डॉक्टरच्या सल्ल्यानुसार शस्त्रक्रियेसाठी काही रुग्णांना नागपूर येथे रेफर करण्यात आले. या महाआरोग्य कॅम्प ला चांदुर बाजार येथील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला यामध्ये ५७६ नागरिकांनी नोंद केली तर १२३ रुग्णांना नागपूर येथे रेफर करण्यात आले. रेफर रुग्णांना जाण्या येण्यासाठी लागणार खर्च तसेच जेवण,औषध, सर्व टेस्ट हे सर्व मोफत करण्यात येणार आहे.या महाआरोग्य शिबिराला प्रहारचे संस्थापक बच्चू कडू , संतोष कीटूकले प्रहार तालुका अध्यक्ष, आबु वानखडे ,जीवन जवंजाळ संस्थापक अध्यक्ष जीवन आधार, डॉ आश्विन रडके, अजय ठाकरे. सचिन खुळे, निलेश वाटाणे, सौ.मंजुषा बोडखे, सौ. निता राऊत,सौ. कविता किटूकले, सौ स्टेला मॅडम , सौ. छाया वाकोडे, सौ शीतल निंभोरकर, सौ माला गवळी, सौ.योगिता तायडे, सौ पद्मताई मेश्कर, सौ .अनिता धाकडे, सौ मुक्ता कुरवाडे, सौ सुनीता तसरे,सौ अनिता शिंगाडे, सौ सुलक्षणा शिंदे ,सौ दिव्या ढवळे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# विधानसभेतील पराजय विसरून कामाला लागा

## जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे पदाधिकाऱ्यांना आवाहन निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर जिल्हा कॉंग्रेसची बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

जिल्ह्यात विधानसभेमध्ये कॉंग्रेसला मोठा धक्का बसला असुन एकही आमदार निवडून आले नाही.त्यामुळे हा पराजय पचवुन नव्या दमाने आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता सज्ज व्हा असा सल्ला वजा आवाहन जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले.विधानसभा निवडणुकीनंतर पहील्यांदाच कॉंग्रेसभवन येथे ग्रामिणची कार्यकारणी बैठक पार पडली. या बैठकीला अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख तर प्रमुख उपस्थिती खा.बळवंत वानखडे तसेच हरीभाऊ मोहोड, रामेश्वर अभ्यंकर, कांचनमाला गावंडे, प्रवीण मनोहर, प्रदीप देशमुख,वासंती मंगरोळे, मुकद्दर खॉं पठाण, बाळासाहेब हिंगणीकर, संजय वानखडे, दयाराम काळे, संजय नागोणे यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाध्यक्ष बबलू देशमूख यांनी विधानसभेचा पराभव विसरून कामाला लागण्याचा सल्ला दिला.





आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक जिंकण्याकरिता जोमाने कामाला लागा तसे नियोजन करा तसेच पक्ष बळकटी करिता गावागावातील कॉंग्रेस संघटन मजबूत करा असे आवाहन देखील जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले.या बैठकीला दिलीपराव काळबांडे,राजेंद्र नागपुरे, महेंद्र सिंह गैलवार, समाधान दहातोंडे,अजिज खान, राजाभाऊ उल्हे, सुनील गावंडे,अतिश शिरभाते,भाई देशमुख, दिलीपराव डाकोरे, शैलेश नाथे, राहुलभाऊ गाठे, सच्चिदानंद बेलसरे, किशोरभाऊ देशमुख, नामदेवराव तनपुरे, श्रीकांतभाऊ झोडपे, गजाननराव टापरे, प्रदीप ज्ञानेश्वरराव देशमुख, अब्दुल कलीम भाई, गिरीश चौधरी, जाहीर भाई बेग, अब्दुल कलीम, हरेराम मालवीय, अमोल होले, श्रीनिवास सूर्यवंशी, पंकजराव वानखडे, विष्णू भाऊ राठोड, रवींद्र हांडे, सौ.कल्पनाताई दिवे, चंद्रशेखर खंडारे, हेमंत येवले, अतुल कानोलीकर, शरद वानखडे, मुकुंद पूनसे, दीपक सवई, निशांत जाधव, हरीश ढोले, शोएब खान, अनाउल्ला खान, नरेंद्र मकेश्वर, श्रीकांत बोंडे, अमित गावंडे, रमेश राव काळे, हमीद खान पठाण, शैलेश राव गवई, राहुल येवले, असलम मंसूरी, सहदेव बेलकर,राजेश सेमलकर, विलास बोरेकार, मयूर देशमुख, संजय खोडस्कर, हिम्मतराव मंदासे, विठ्ठलराव सरडे, मोहन सिंगवी, सिद्धार्थ बोबडे,सुरेश देशमुख,विनोद पवार, भूषण कोकाटे, रवींद्र हिरुळकर, सेतू देशमुख, सतीश पारधी, राजू कुरेशी उपस्थित होते.

### अंजनगाव सुर्जी तालुक्यातील १६ गावांची पोखरात निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अंजनगाव सुर्जी**

महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यांमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोखरा)- २ योजना राबविण्यासाठी शासनाची मंजुरात मिळाली असून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा टप्पा दोन राबविण्यात येणार आहे. त्याअंतर्गत तालुक्यातील १६ गावांची निवड करण्यात आली आहे.

शाश्वत शेतीतून शेती उत्पादन वाढविणे, शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देणे, असा या योजनेचा उद्देश आहे.

गेल्या पाच वर्षांतील महत्त्वाकांक्षी जलयुक्त शिवार अभियान योग्य पद्धतीने राबविण्यात आले होते. आता पोखरा योजनेतून कामे केली जाणार आहेत. पोखरा योजनेत धनेगाव, बोराळा, टाकरखेडा मोरे, आलमपूर, तुरखेड, कारल, धनवाडी,निमखेड आडे, हुसेनपूर धुळकी, भुरसखेड, मामराबाद, रौदळपूर, पोही, शेकापूर, चिचोली शिंगणे, सैय्यदगाव या गावांचा समावेश आहे. या अंतर्गत लाभार्थी निवडीसाठी कृषी विभागामार्फत ग्राम कृषी संजीवनी समित्या स्थापन केल्या जाणार आहेत.

# स्थानांतरणासाठी नवीन इमारतीमधील समस्यांवर तोडगा काढा : आमदार खोडके

## डफरीन-इर्विन-सुपर स्पेशालीटीतील आरोग्यसेवा, उपाययोजनांसाठी बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

डफरीन, इर्विन व सुपर हॉस्पिटलमध्ये उपलब्ध सोयी सुविधांच्या अनुषंगाने आमदार खोडके यांनी शनिवारी ४ जानेवारीला आढावा बैठक घेतली. डफरीन रुग्णालय परिसरात २०० खाटांची नवीन इमारत तयार झाली असून लक्करच डफरीन नवीन इमारतीमध्ये स्थानांतरीत करण्यासाठी बैठकीत चर्चा करण्यात आली.

नवीन ईमारतीत शल्यचिकित्सागृह सुरु करण्याबाबत काही प्रशासकीय प्रक्रिया व निधीची गरज असल्याची माहितीसुद्धा आमदार खोडके यांना आरोग्य अधिकाऱ्यानी दिली. यावर आमदार सुलभा खोडके यांनी रुग्णालय प्रशासनाला त्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची सूचना केली. तसेच समस्यांवर तोडगा काढून



तातडीने नक्ति ईमारतीत रुग्णसेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना केल्यात.

दरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) बाबतचा सुद्धा आढावा घेण्यात आला. इर्विन मध्ये ३७९, बेड उपलब्ध असतांना मात्र सातशेहून अधिक रुग्ण दाखल होतात. त्यामुळे आरोग्य यंत्रणेला उपचाराला घेऊन चांगलीच कसरत करावी लागते. इर्विनची ८०० खाटांची नूतन इमारत प्रस्तावित असल्याने आगामी काळात निधीसाठी पाठपुरावा करणार असल्याचे आमदार खोडके यांनी सांगितले. तसेच नवीन इमारत तयार होईपर्यंत इर्विनमधील रुग्णांसाठी डफरीन भागात तात्पुरते रुग्णालय सुद्धा साकारण्यात येणार असल्याचे या बैठकीत सांगण्यात आले. यावेळी आमदार सुलभा खोडके यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल च्या फेज-१ व फेज-२ मध्ये सध्या सुरु असलेल्या आरोग्य सेवांची माहिती जाणून घेतली. सध्या रुग्णालयात २२० बेडची सुविधा उपलब्ध आहे. मात्र प्रत्यक्षात भरती रुग्णांची संख्या ही साडेतीनशे ते चारशे इतकी आहे. तर येथे अनेक रिक्त पदांमुळे मनुष्यबळाचा अभाव आहे. त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यावरील कामाचा ताण वाढल्याचे सुपर हॉस्पिटल प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. या बैठकीला राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके, सीएस डॉ. दिलीप सौंदळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनोद पवार, सुपरचे एमएस डॉ. अमोल नरोटे, यश खोडके, डॉ. मंगेश मेढे तसेच सम्बाक्वेि अधिकारी, अधिकारी, वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

# २४ तबला वादकांची झाकीर हुसेन यांना मांवनदना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**



उस्ताद झाकीर हुसेन यांना रविवारी अमरावती करांनी अनोखी श्रद्धांजली अर्पण केली.प्रख्यात तबला वादक मुकुंदराव सराफ यांचे संयोजन व दिग्दर्शनाखाली तब्बल २४ तबला वादकांनी झाकीरभाईंना सांघिक तबला वादनाद्वारे यादगारमानवंदना दिली. जवळपास दोन तास चाललेल्या या मैफिलीत नामवंत तबला गायकांपासून अगदी बाल वादकांनी उस्ताद झाकीर हुसेन व इतर नामवंततबला वादकांच्या गाजलेल्या मैफिलीतील मध्य किवा द्रुत लयीतील कानात साठवून ठेवाव्यात अशा रचना सादर केल्या. दीर्घकाळ हा अनोखा श्रद्धांजली कार्यक्रमलक्षात राहील. या अद्वितीय आयोजनासाठी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी पुढाकार घेतला.

# बहिरम यात्रेत 'बैलगाडा शर्यती' सोबतच राजकीय चढाओढ

## पुन्हा राजकीय धुरळा उडण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे आणि माजी आमदार बच्चू कडू यांच्यात राजकीय द्वंद्व सुरू असतानाच आता बहिरम येथील यात्रेत दोन्ही नेत्यांनी आयोजित केलेल्या शंकरपटाच्या (बैलगाडा शर्यत) निमित्ताने पुन्हा राजकीय धुरळा उडण्याची शक्यता आहे. बहिरम यात्रेच्या इतिहासात प्रथमच दोन शंकरपटांचे आयोजन करण्यात आले आहे.आमदार प्रवीण तायडे यांच्या वतीने येत्या ८ ते १० जानेवारीदरम्यान बहिरम येथे शंकरपट आयोजित करण्यात आला आहे, तर माजी आमदार बच्चू कडू यांच्या वतीने आयोजित शंकरपट २१ ते २३ जानेवारीदरम्यान रंगणार आहे. यावर्षी यात्रेकरूंना दोन वेगवेगळ्या शंकरपटांचा थरार अनुभवायला मिळणार आहे.

बहिरम यात्रेला शंकरपटाचा इतिहास आहे. मध्यंतरीच्या काळात ही परंपरा खंडित झाली होती. पण, प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी अलीकडच्या काळात शंकरपट सुरू केला. बच्चू कडू यांनी यंदा आयोजित केलेल्या शंकरपटात दहा लाख रुपयांच्या बक्षिसांची लयलूट केली जाणार आहे.आमदार प्रवीण तायडे यांच्या वतीने आयोजित शंकरपटात ११ लाख रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहे. यंदा बहिरम यात्रेत प्रवीण तायडे यांचा फलक अज्ञात व्यक्तींनी फाडून टाकल्यानंतर निर्माण झालेल्या वादात प्रहार आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष उफाळून आला होता. त्यातच प्रवीण तायडे यांनी बच्चू कडू यांना शिवीगाळ केल्याचा आरोप करीत प्रहारच्या कार्यकर्त्यांनी प्रवीण तायडे यांच्यावर कारवाईची



मागणी जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षकांकडे केली होती. त्यातच आता दोन्ही नेत्यांकडून शंकरपटांचे आयोजन करण्यात आले आहे. बहिरमची यात्रा दरवर्षी कुठल्या ना कुठल्या कारणाने गाजत असते. राजकीय पुढाऱ्यांचे फलक हे चर्चेचे विषय ठरत असतात.

संपूर्ण राज्यात दीर्घकाळ चालणारी यात्रा म्हणून ओळख असलेल्या बहिरमच्या यात्रेला गेल्या महिन्यात उत्साहात प्रारंभ झाला. बहिरमबाबांच्या दर्शनाला दरवर्षी हजारो भाविक येतात. विदर्भातच नव्हे तर संपूर्ण राज्यात ही यात्रा प्रसिद्ध असल्याने भाविक सलग दीड महिना देवदर्शन व यात्रेचा लाभ घेतात.

यात्रेत हंडीतील मटण आणि रोडगे प्रसिद्ध आहेत. खवय्यांसाठी ही यात्रा एक मेजवानी ठरते. हंडीतील मटण किंवा वांग्याची भाजी आणि रोडग्याचा आस्वाद घेण्यासाठी दूरदूरवरून भाविक या ठिकाणी येतात. मांसाहारी खानावळी यात्रेत असतात. चुलीवरची गरमागरम भाकर हे आकर्षण असते. काही खवय्ये मित्रपरिवारासह राहुटीमध्ये सहभोजनाचे आयोजन करतात. बहिरमच्या रोड्‌ग्याच्या जेवणासाठी लोक शनिवार-रविवारी दूर अंतर पार करून बहिरमला येतात.

# "एक लाख द्या अन्? पाच लाख घ्या," इन्स्टाग्रामवरील दाव्याने खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६बुलडाणा**

एक लाख रुपये द्या अन्? त्याबदल्यात पाच लाख रुपयाच्या बनावट नोटा घेऊन जा, असा दावा इन्स्टाग्रामवरून करण्यात आल्याने आणि यावर कळस म्हणजे हे आव्हान करणाऱ्याने बुलढाणा जिल्ह्यातील पत्ता दिल्याने पोलीस प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली. स्थानिक गुन्हे शाखेने याची गंभीर दखल घेत तपास सुरू केला आहे.

पाच जानेवारी रोजी दुपारी ही धक्कादायक बाब किंबहुना नेटकरी आणि पोलिसांना चक्रावून टाकणारा घटनाक्रम समोर आला. मिळालेल्या माहितीनुसार, इन्स्टाग्रामवर 'अंडरस्कोअर शिव अंडरस्कोअर तांडव, अंडरस्कोअर ९९' या अकाउंटवरून चेक इन करन्सीच्या नावाखाली एक लाखाच्या बदल्यात पाच लाख रुपयाच्या बनावट नोटा देण्याचे आश्वासन देण्यात आले. यासाठी मोबाइल क्रमांकदेखील देण्यात आला. तसेच क्लीप तयार करणाऱ्याने आपला पत्ता धामणगाव, बुलढाणा जिल्हा, मलकापूर रेल्वे स्टेशन, असा नमूद केला. त्यामुळे बनावट नोटांचे कनेक्शन मलकापूरशी असल्याची चर्चा जोरात सुरू आहे.

विशेष म्हणजे, हा दावा करणाऱ्याने आपला मोबाइल क्रमांकदेखील दिला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या/क्लीपमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली. याबाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाशी संपर्क साधला असता त्यांनी देखील या संदर्भात दखल घेतल्याचे सांगितले. आपल्या काही टीम यावर काम करत आहेत, बनावट नोटांचा रॅकेट उघड करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.काही महिन्यांपूर्वीच मलकापूर येथे बनावट नोटा छापाण्याची मशीन पोलिसांनी जप्त केली होती. या मशीनची किंमत अंदाजे दीड कोटी रुपये असल्याचे समोर आले होते. त्यानंतर आता सदर व्हिडीओ समोर आल्याने बनावट नोटांचे मोठे रॅकेट जिल्हयात सक्रिय असावे, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

# भाऊ तोरसेकर यांना जीवन गौरव, श्रीमंत माने राज्यस्तरीय व गीता तिवारी विभागस्तरीयच्या मानकरी

## अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

मराठी पत्रकार परिषद मुंबई संलग्नित अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारे पत्रकारितेतील सन २०२४ चे विविध पुरस्कार आज संघटनेचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांनी जाहीर केले. सोमवार, दि. २७ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या ऑडिटोरिअम येथे आयोजित सोहळ्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे जीवन गौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर, राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार श्रीमंत माने, विभागस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार गीता तिवारी, जिल्हास्तरीय (शहर) पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ सुरेंद्र चापोरकर आणि जिल्हास्तरीय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्कारासाठी मंगेश भुजबळ मानकरी ठरले आहेत.

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघ हा अनेक वर्षांपासून जिल्ह्यात कार्यरत आहे. या संघामध्ये जिल्हयातून प्रकाशित होणाऱ्या दैनिकांचे संपादक, जिल्हा प्रतिनिधी, प्रतिनिधी, पत्रकार, छायाचित्रकार तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे जिल्हा प्रतिनिधी सदस्य म्हणून कार्यरत आहे. या संघातर्फे दरवर्षी पत्रकारांना विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात.अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे देण्यात येणाऱ्या सन २०२४ या वर्षीच्या पत्रकारिता पुरस्काकरिता पाच सदस्यीय निवड समिती तयार करण्यात आली होती. या समितीत विजय ओडे, संजय बनारसे अरुण तिवारी, सुधीर भारती, सुधीर केणे यांचा समावेश होतो. तसेच या समितीचे पदसिध्द सदस्य संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल, महासचिव प्रफुल घवळे आहेत.

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे सन २०२४ करिता निवड झालेल्या मानकरींचा सविस्तर परिचय:

**राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार**

३० वर्षपिक्षा अधिक काळ पत्रकारितेचा अनुभव असलेले भाऊ तोरसेकर उर्फ गणेश वसंत तोरसेकर यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. भाऊ तोरसेकर हे राजकीय विषयांवर लिखाण करणारे आणि



प्रतिपक्ष या नावाने यूट्यूब चैनलद्वारे आपली राजकीय भूमिका मांडणारे स्वतंत्र पत्रकार आहेत. तोरसेकर हे एक आर्किटेक्चर गॅज्युएट आहेत. भाऊ तोरसेकर यांनी १९६९ मध्ये आचार्य अत्रे यांच्या दैनिक मराठा येथून पत्रकारितेच्या कारकिर्दीला सुरूवात केली. साप्ताहिक भूपुत्र, ब्लिट्झ (मराठी), सकाळ (मुंबई) मधून पत्रकारिता केली. १९८५ ते १९८९ या काळात शिवसेनेचे मुखपत्र मार्मिक या साप्ताहिकातून कार्यकारी संपादक म्हणून काम पाहिले. त्यांनतर विवेक, चित्रलेखा यांसारख्या साप्ताहिकांमध्ये त्यांनी काम केले.१९९४ ते १९९७ च्या दरम्यान आपला वार्ताहर चे मुख्य संपादक म्हणून काम पाहिले. भाऊ १९९८ पासून स्वतंत्र पत्रकार म्हणून काम करत आहे. २०१० मध्ये पुण्यनगरी दैनिकातून उलट तपासणी हे सदर चालवलं. दि. २३ जून २०२१ रोजी भाऊंना राज्यपाल (महाराष्ट्र) भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी स्मृती सन्मान प्रदान करण्यात आलाजीवन गौरव पुरस्कार स्व. दादासाहेच काळमेघ स्मृती जीवन गौरव पत्रकारिता पुरस्कार या नावाने राहील. या पुरस्काराचे पुरस्काराचे पुरस्कर्ते हेमंतराव काळमेघ राहतील, या पुरस्काराचे स्वरूप रोख रूपये ४१,०००/- रोख, सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ राहील.

**राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार श्रीमंत माने**

संपादक- दैनिक लोकमत नागपूर आवृत्ती यांना जाहीर करण्यात येत आहे. त्यांनी पत्रकारितेमध्ये ३० वर्षापेक्षा अधिक काळ घालविला आहे. पत्रकारितेचा आरंभ काळात अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात सामाजिक कार्यकर्ता म्हणून कार्य, राष्ट्रीय व राज्यस्तरावरील मराठी, इंग्रजी वृत्तपत्रामध्ये चिखलदरा, अमरावती, अकोला, जळगांव, नाशिक, नागपूर आदी ठिकाणी ३३ वर्षे बातमीदार व संपादक पदावर कार्य. आदिवासी, ग्रामीण भागातील ज्वलंत समस्यांवर विविधांगी, मूलगामी व परिणामकारक वृत्तांकन, पत्रकारितेसोबत आदिवासी विकास, कुपोषणाची समस्या, वन व वन्यप्राणी संरक्षण, जलसंधारण, कृषी विकास, शेतकरी आत्महत्या, अनुशेष निर्मूलन, पर्यावरण रक्षण, फलोत्पादन विकास आदी विषयांवर क्षेत्रांमध्ये काम, महाराष्ट्र सरकारच्या जलसंधारण सलागार परिषदेचे तज्ज्ञ सदस्य म्हणून सहा वर्षे काम. नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, जळगांव येथील कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, अमरावतीच्या जुने विदर्भ महाविद्यालय या स्वायत्त संस्थेचे अभ्यासमंडळ तसेच समित्यांवर काम केले.राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार स्व. जुगलकिशोरजी अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार या नावाने राहील. या पुरस्काराचे पुरस्कर्ते दै. अमरावती मंडल व मातृभूमि राहतील. पुरस्काराचे स्वरूप रोख रु. ३१,००००, सन्मानचिन्ह, शाल श्रीफळ राहील.

**विभागस्तरीय पत्रकारिता पुरस्कार गीता तिवारी**

विदर्भ इंचार्ज तथा उपसंपादक दैनिक भास्कर यांना जाहीर करण्यात येत आहे. नागपूरमध्ये पत्रकारितेचा ३० वर्षाचा प्रदीर्घ अनुभव. १९९६ ते २००९ या कालावधीत साप्ताहिक विदर्भ चंडिका मध्ये उपसंपादक म्हणून कार्य. दैनिक भास्कर वृत्तपत्रात २००२ पासून अमरावती येथे ब्यूरो चीफ, यवतमाळ जिल्हा ब्यूरो चीफ व सद्यस्थिती नागपूर येथे विदर्भ इंचार्ज तसेच उपसंपादक म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. बंगलोर येथील एका प्रकाशन संस्थेमध्ये लेख, कविता सातत्याने प्रकाशित केल्या, अनेक वृत्तपत्रात स्तंभलेखन केले आहे.विभागस्तरीय पत्रकारिता पुरस्काराचे पुरस्कर्ते राहुल गडपाले समूह संपादक दै. सकाळ मुंबई राहतील. पुरस्काराचे स्वरूप, रोख रू. २१,०००/-, सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ राहिल .

**जिल्हास्तरीय (शहर) पत्रकारिता पुरस्कार**

जिल्हा प्रतिनिधी दैनिक सकाळ अमरावती यांना जाहीर करण्यात येत आहे. चापोरकर हे २८ वर्षांपासून पत्रकारितेमध्ये कार्य करीत आहे. श्री शिक्षण संस्थेच्या कला-वाणिज्य शाखेत पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना शिक्षण, तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात विद्यार्थ्यांना पत्रकारिता शिक्षण दिले.जिल्हास्तरीय (शहर) पत्रकारिता पुरस्काराचे पुरस्कर्ते दै. विदर्भ मतदार राहतील. पुरस्काराचे स्वरूप रोख ११,०००/-, सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ राहील.

**जिल्हास्तरीय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्कार मंगेश भुजबळ**

धामणगांव तालुका प्रतिनिधी दैनिक देशोन्नती यांना जाहीर करण्यात येत आहे. गेल्या १५ वर्षांपासून पत्रकारितेमध्ये कार्यरत आहे. या काळात त्यांनी विविध वृत्तपत्रात कार्य केले. धामणगांव तालुक्यातील विविध प्रश्नावर त्यांनी लिखाण केले आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, शोषित समाजाचे प्रश्न हा अभ्यासाचा विषय आहे. सातत्यपूर्ण पत्रकारिता ही त्यांची जमेची बाजू आहे. पत्रकारितेमध्ये धामणगांव मध्ये दै. महासागर, मातृभूमि, वृत्त केसरी, सिटी न्यूज चैनल, दिव्य मराठी मध्ये कार्य केले.जिल्हास्तरीय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्काराचे पुरस्कर्ते दै. जनमाध्यम राहतील. पुरस्काराचे स्वरूप रोख ११,०००/-, सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ राहील.

# यशोगाथा २ युवा शेतकऱ्यांची! शेकडो शेतकऱ्यांना दिला शेतीतून समृध्दीचा मंत्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

''केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे'' या उक्तीला परिश्रमाची जोड देत जोखीम पत्करत चांदूरबाजार तालुक्यातील रुपेश उल्हे व अभिजीत बंड या दोन युवा शेतकऱ्यांनी शेतीतून समृद्धी चा मार्ग तयार केला आहेकपाशी, तूर, सोयाबीन, चना या कोरड वाहू तसेच संत्रा बागायती या पिकावर गेल्या काही वर्षापासून सुरू असलेल्या अस्मानी व सुलतानी संकटामुळे शेतकऱ्यांची पोरं शेतीपासून दूर जात आहे अशा या परिस्थितीत फक्त कोरडवाहूच पिकासाठी पोषक आहे असा समज असलेल्या शेतीतुन वडूरा येथील रुपेश उल्हे व खरवाडी येथील अभिजीत बंड या तरुण पोरांनी सहा वर्षांपूर्वी टरबूज लागवडीचा नाविन्यपूर्ण प्रयोग सुरू केला तेव्हापासून टरबूज आणि खरबूज पिकात कुशल होण्याच्या दृष्टीने त्यांनी दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन घेण्यासह विविध वाणांचे व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर त्यांनी सुरू केलाकेवळ पीक लागवड करून विक्री झाली म्हणजे सगळे झाले असे होत नाही बाजारपेठ म्हटलं की तेजी, मंदी आलीच माला बरोबर आपले नावही जोडलेले असते, व्यापाऱ्यांमध्ये प्रसिद्ध होण्यासाठी तुमच्या मालाचा दर्जा उत्तम हवा, सातत्य असल्याने मंदीतही पैसे होतात हे त्यांच्या लक्षात आले म्हणून .या पिकांच्या उत्पादनवाढीसाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन यामध्ये सेंद्रिय, जैविक व रासायनिक खतांचा संतुलित अवलंब पिकांच्या उत्पादकतेसाठी माती, पाणी, बियाणे व्यवस्थापनाला सर्वाधिक महत्त्वदिले, लागवडीवर जास्त भर देत,नासिक च्या रोपवाटिकेतून



निरोगी रोपे तयार करून घेतली .आणि.. हाच त्यांचा टर्निंग पॉईंट ठरला असे म्हणता येईल कपाशी, सोयाबीन, तूर हे पारंपरिक पीक घेतल्या नंतर उण्यापुऱ्या तीन महिन्यांत एकरी लाखोंचे उत्पन्न हे पीक देत गेलेमग फक्त या पिकावर न थांबता व वर्षभर टरबूज, खरबूज, टोमॅटो, झेंडू, सोबतच भाजीपाला वर्गीय पिकातून समृद्धीकडे वाटचाल या तरुणांची सुरू झाली

बघता बघता तालुक्यातील शेकडो तरुण शेतकऱ्यांनी या युवा जोडगोळी ची वाट चोखळली आहेसद्यस्थितीत लागवडी पासून ते विक्री पर्यन्त चे मार्गदर्शन रुपेश उल्हे शेताच्या बांधावर जाऊन करतो म्हणून गतवर्षी खरवाडी येथील एक हात नसलेल्या दिव्यांग अमोल भाजीपाले या तरुण मुलाने एक एकरातून तबबल ३५ टन टरबूज घेऊन साडे तीन लाखाचे उत्पादन घेतलेआज याचा परिपाक म्हणून फक्त आणि फक्त कोरडवाहू पट्टा म्हणून ओळखला जाणाऱ्या या भागात आता बागायती शेती करून समृद्धी ची कास युवा शेतकऱ्यांनी धरली आहे

**कृषी अधीक्षक कडून शाबासकीची थाप!**

अलीकडील काळात हवामान बदलामुळे सर्वच भाजीपाला उत्पादकांपुढे आव्हान निर्माण झाले आहे. प्रत्येक वर्षी वेगवेगळ्या अडचणी येत असतात अनेकदा बियाण्यांची उगवण एकसारखी होत नाही. दुबार टोकनही करावी लागते यामुळे पिकाचा कालावधी कमी जास्त होतोएकंदरीत।शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी' या संत वचनामध्ये बीजप्रक्रियेचे महत्त्व सांगितले गेले आहे बाब हेरून या पठ्ठ्यानी अत्याधुनिक रोपवाटिका उभारण्याचा आणखी एक धाडसी स्वप्न दोन वर्षांपूर्वी बघितले व आज ते प्रत्यक्षात उतरविलेचांदुर बाजार तालुक्यातील एकमेव रोपवाटिकेचे उद्घाटन नुकतेचजिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले या युवकांची शेतीप्रति असलेली प्रतिबद्धता बघून त्यांनी शाबासकीची थाप व मोलाचा सल्ला पण या युवकांना दिला या वेळी झालेल्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपविभागीय कृषी अधिकारी अनिल बोंडे श्री रविंद वाघमारे,उमेश फुलारी राहुल सिंग विषवजीत चव्हाण सुधीर जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.